महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र
रजि.नं. महा/२८५/९८/नागपूर

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !
महाराष्ट्र पक्षिमित्र
स्थापना १९८९

# पक्षिमित्र

वर्ष १० वे । अंक ४ था । दि. १ जुलै २०२० । पाने - ४१ । संपादक : दिगंबर गाडगीळ



## * संपादक *

– संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ । चलभाष : ९८८१०७९७११

– सहसंपादक

**श्री. अनिल माळी, नाशिक** / Email : anilmali@yahoo.co.in
**श्री. किरण मोरे, अमरावती** / Email : kiranmorey1983@gmail.com

## * कार्यकारिणी *


| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | डॉ. जयंत वडतकर, अमरावती (मो. ९८२२८७५७७३) |
| कार्याध्यक्ष | – | डॉ. राजू कसंबे, ठाणे (मो. ९००४९२४७३१) |
| संघटक | – | प्रा.डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, अहमदनगर (मो. ९८५०२९१३२४) |
| कार्यवाह | – | प्रा.डॉ. गजानन वाघ, अमरावती (मो. ९८२२२०४०७०) |
| सहकार्यवाह | – | श्री. शरद आपटे, सांगली (मो. ९८९०३८४४००) |
| सहसंघटक | – | श्री. अनिल माळी, नाशिक (मो. ९८५०८१८६४४) |
| सदस्य | – | प्रा. निनाद शाह, सोलापूर (मो. ९४२२४५९९१५) |
| सदस्य | – | श्री. किशोर गठडी, औरंगाबाद (मो. ९४२२२०२६२८) |
| सदस्य | – | श्री. रोहन भाटे, कराड (सातारा) (मो. ९४२२००४८००) |
| सदस्य | – | श्री. सचिन मेन, पालघर (मो. ८४४६२४८८८४) |
| सदस्य | – | श्री. अनिल महाजन, वरणगाव-जळगाव (मो. ८८०६१९८०४०) |

## * सल्लागार मंडळ *

श्री. भाऊ काटदरे (चिपळूण) मो. ९४२३८३१७००
श्री. दिगंबर गाडगीळ (नाशिक) मो. ९८८१०७९७११
डॉ. दिलीप यार्दी (औरंगाबाद) मो. ९४२२७०४२२१
डॉ. अनिल पिंपळापुरे (नागपूर) मो. ९८८१७१३४६६
श्री. बापुसाहेब भोसले (अहमदनगर) मो. ९८२२६३३१३३

मुखपृष्ठ – Lesser flroican (तणमोर) | छायाचित्र : कौस्तुभ पंढरीपांडे, 'संवेदना', कारंजा लाड

मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



## संपादकीय
## कोरोनाचा परिणाम

दिगंबर गाडगीळ

कोरोनामुळे लादलेल्या निर्बंधांमुळे रस्त्यांवरची रहदारी कमी झाली. त्यामुळे वन्यजीवांची वर्दळ वाढली. भर रस्त्यांवर बिनधास्त वावरणारे सिंह, हत्ती, हरण यांच्या चित्रफिती सोशल मीडियावर फिरू लागल्या. त्याला पक्षीही अपवाद नव्हते. ते रस्त्यांवर उतरत नव्हते; पण लोकांच्या अंगणात, झाडावर त्यांच्या फेऱ्या वाढल्याच्या चित्रफिती किंवा प्रकाशचित्र सोशल मीडियावर दिसू लागल्या. मात्र त्या काळात आपला छापील अंक नव्हता.

त्यातच माझ्या हाती एक लेख इंटरनेटवरच मिळाला. अंतराळात एका आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशन फिरत आहे. ते पृथ्वीपासून साधारण २४० मैल दूर तरंगत आहे. त्याने जगातील वन्यजीवांच्या हालचालींवर नजर ठेवण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे वन्यजीव हालचालींच्या क्षेत्रात क्रांती घडू शकेल.

२०१८ मध्ये अंतराळात मुक्तपणे फिरणाऱ्या रशियन अंतराळवीरांनी या अंतराळ केंद्रावर एक प्रचंड अँटिना आणि इतर काही सामग्री बसवली आहे. त्यांच्या चाचण्या झाल्यावर ती सामग्री काम करू लागेल. त्यामुळे व्यापक क्षेत्रावरील माहिती हाती येऊ शकेल. वन्यजीव कुठे आहेत एवढेच नव्हे तर ते ज्या पर्यावरणात व प्रकृतीत आहेत याची माहिती मिळेल. अशा माहितीचा उपयोग वन्यजीवशास्त्रज्ञ, पर्यावरणाच्या रक्षणासाठी झटणारे पर्यावरणशास्त्रज्ञ यांना करता येईल.

या हाताळणीला 'इंटरनॅशनल कॉर्पोरेशन फॉर ॲनिमल रिसर्च युसिंग स्पेस' (ICARUS) असे नाव दिलेले आहे. त्यातून विस्तृत क्षेत्रावरील माहिती मिळत राहील.

या प्रक्षेपण माहितीतून स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांचे महाकळप, त्यांची दूरवरची स्थलांतरे तर कळतीलच; पण लहानसहान जीव अगदी कीटकसुद्धा सुटू शकणार नाहीत. वातावरणातील बदल, परिसर ऱ्हास लक्षात येऊ शकेल. त्यातून जीवशास्त्रज्ञांना हे जीव ज्या जागी जाणार असतील तेथे त्वरित उपाययोजना करता येतील.

त्यातून आणखी एक फायदा संभवतो. जगात कुठेही राहणाऱ्याला स्मार्ट फोनच्या मदतीने या हालचाली टिपता येतील. त्याला वन्यजीवांसाठीचे आंतरजाल म्हणता येईल. या माध्यमातून आपल्या आवडत्या पक्ष्याचा, कासवाचा किंवा माशाचा ठावठिकाणा तपासता येईल.

याला पूरक म्हणून जमिनीवर वावरणाऱ्या शास्त्रज्ञांना अगदी काही ग्रॅम वजनाची, सौर ऊर्जेवर चालणारी उपकरणे कार्यान्वित करून समन्वय साधता येईल. चीनमध्ये वावरणाऱ्या बदकाच्या शरीराचे तापमान जाणून घेऊन पुढील एनफ्ल्यूएंजासदृश साथीची शक्यता अजमावता येईल.

आपण या ICARUS प्रणालीचे स्वागत करू या.

कोरोना गेलेला नाही. त्याच्या सध्याच्या अस्तित्वासाठी आपल्याला तयार राहावे लागेल. मास्क वापरणे, वारंवार हात धुणे, गर्दी-रेटारेटी टाळणे या गोष्टींची सवय करून घ्यावी लागेल.

**दिगंबर गाडगीळ**
३०, आनंदवन कॉलनी, कॉलेजरोड,
नाशिक : ४२२००५
९८८१०७९७११

# अध्यक्षीय



डॉ. जयंत वडतकर

रेवदंडा येथील संमेलन आटोपल्यानंतर मार्चपर्यंत एप्रिलच्या अंकाचे काम मा. संपादक महोदय यांनी जवळपास पूर्ण केले होते आणि १५ मार्च नंतर अंक छपाईसाठी पाठविणार तेवढ्यात कोव्हीड–१९ च्या आकस्मित आलेल्या जागतिक संकटामुळे लॉकडाऊन घोषित झाले आणि पुढील सर्वच काम थांबले. जेथे सर्व जग थांबले तेथे आपली काय कथा, अशी एकंदरीत परिस्थिती ओढविली; आणि एप्रिलच्या अंकाचे काम थांबले. महिनाभरात पुन्हा सुरळीत होईल अशी आशा करीत दोन–तीन महिने कसे गेले ते कळले सुद्धा नाही. शेवटी आता अंक छपाई होणे काही शक्य नाही असे वाटल्याने हा अंक ई–स्वरूपात तयार करण्यात आला आणि उशिरा का होईना जूनमध्ये तो आपल्या सर्वांच्या हाती आला. या अंकाचे नवीन आकर्षक रंगीत स्वरूप सर्वांनाच आवडले. आपण तशा प्रतिक्रिया समाज माध्यमांद्वारे व ई–मेल वरून कळविल्या त्याबद्दल सर्वांचे मनपूर्वक आभार. त्यानंतर जुलैचा अंक काढण्यापर्यंतसुद्धा परिस्थिती काही पूर्ववत न झाल्याने हा अंक सुद्धा ई–स्वरुपात आपल्या हाती देण्यात येत आहे. मागील अंकात ज्या काही किरकोळ चुका होत्या त्या दुरुस्त करण्याचा प्रयत्न या अंकात करण्यात आला आहे. आपल्याला हा अंकसुद्धा आवडेल अशी आशा करतो. आपल्याला जर मागील दोन–तीन वर्षातील अंक हवे असतील तर ते आपल्या वेबसाईट वर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

लॉकडाऊन सुरुवातीचा काळ कठीण गेल्याने कुठलाही विचार करता आला नाही. या दरम्यान निसर्गामधील मानवी हस्तक्षेप अचानक थांबल्याने वन्यजीवांच्या वागणुकीत बदल दिसू लागले, त्याची अनेक ठिकाणी झालेली नोंद समाज माध्यमांद्वारे आपल्यापर्यंत पोहोचू लागली. आपल्यालाही वेळ मिळाल्याने कधी नव्हे ते निसर्गातील बदल बघण्यासाठी बघता येऊ लागले, कधी न दिसणारे पक्षी आपल्याला अगदी जवळ दिसू लागले, त्यांचे आवाज स्पष्ट ऐकता येऊ लागले, या पक्षी विश्वाची अनेकांनी छायाचित्रण आणि 'ई–बर्ड'वर नोंद करून दखल घेतली. यावेळी सामान्य नागरिकांमध्येसुद्धा पक्ष्यांविषयी उत्सुकता निर्माण होताना दिसत होती. या टाळेबंदीच्या काळात आपल्याला काही उपक्रम घेता येतील का असा विचार करीत असतानाच BNHS संस्थेने वेबिनारच्या माध्यमातून व्याख्यानांचे आयोजन सुरू केले. त्याच धरतीवर आपणसुद्धा पक्ष्यांविषयी सखोल व शास्त्रीय माहिती पक्षीमित्रांना, निसर्गप्रेमींनी व महाराष्ट्रपक्षीमित्र सभासदांना मराठीमध्ये व्हावी या दृष्टीने 'महाराष्ट्र पक्षीमित्र'तर्फे पक्षी अभ्यासकांच्या व पक्षी तज्ज्ञांच्या व्याख्यानांची मालिका सुरू करण्यात आली. आपले कार्याध्यक्ष डॉ. राजू कसंबे यांनी सुरुवातीला तांत्रिक स्वरूपाचे मार्गदर्शन केले आणि १० एप्रिलपासून या वेबिनार मालिकेची सुरुवात झाली. पक्षी तज्ज्ञांचे 'पक्षी' या विषयावरील मराठी भाषेतील व्याख्यानांचा महाराष्ट्रातील हा पहिलाच उपक्रम होता. त्यास सर्वच स्तरांतून भरघोस प्रतिसाद लाभला. त्यानंतर या उपक्रमाचे अनुकरण करीत ठिकठिकाणच्या अनेक संस्थांनीसुद्धा अशा ऑनलाइन व्याख्यानांचे आयोजन केले. 'महाराष्ट्र पक्षीमित्र'तर्फे आयोजित या व्याख्यानांच्या मालिकेत लागोपाठ अशी एकूण २३ व्याख्याने ऑनलाइन पद्धतीने पार पडली. यामध्ये मार्गदर्शक म्हणून BNHS, बर्ड काउंट इंडिया, इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगळूरू, अशा संस्थांमधील संशोधक, महाराष्ट्रातील पक्षिविषयक कार्य करणारे तज्ज्ञ अभ्यासक, संवर्धक, तसेच प्रशासन सेवेतील अधिकारी मा. जिल्हाधिकारी श्री. अभिमन्यू काळे असे वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ लाभले होते. या प्रत्येक व्याख्यानास पूर्ण क्षमतेने श्रोत्यांची उपस्थिती मिळत होती.

सुरुवातीला १०० श्रोत्यांची क्षमता असल्याने, त्यापेक्षा जास्त श्रोत्यांना प्रवेशसुद्धा मिळू शकत नाही असे चित्र बघावयास मिळत होते. त्यानंतर Bird Count India या संस्थेच्या डॉ. सुहेल कादर यांच्या सहकार्याने 'महाराष्ट्र पक्षीमित्र'ला झूम'ची लिंक उपलब्ध झाल्याने पुढील वेबिनारमध्ये जास्त लोकांना सहभागी होता आले. या व्याख्यानमालेत विविध विषयांवर एकूण २३ व्याख्याने पार पडली. त्यामध्ये एकूण २८०४ पक्षी अभ्यासक तथा निसर्गप्रेमी, सभासद यांनी या व्याख्यानांचा लाभ घेतला. यातून अनेक महत्त्वाचे विषय आपल्या सभासदांपर्यंत पोहोचले. आपल्या सर्वांचा या उपक्रमास खूप छान प्रतिसाद लाभला त्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार. या अंकात या वेबिनार मालिकेबद्दलचा अहवाल देण्यात आलेला असून त्यामध्ये आपणास वक्ते आणि त्यांचे विषय बघता येतील.

वेबिनार मालिकेच्या माध्यमातून संस्थेची माहिती अनेक नवीन निसर्गप्रेमींपर्यंत पोहोचली. त्यातून सभासद होण्यासाठी अनेकांनी इच्छा प्रदर्शित केली. परंतु गेल्या चार-पाच महिन्याच्या काळात बंदमुळे अर्ज व सभासद शुल्क पाठविणे शक्य नसल्याने अडचण होत होती, त्यावर तातडीने विचार करून सभासद अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरण्यासाठी वेबसाईटवर व्यवस्था करून देण्यात आली. त्यामुळे गेल्या तीन महिन्याच्या काळात जवळपास २६ नवीन सभासद जुळू शकले. या सर्वांची यादी या अंकात देण्यात आली असून, त्या सर्व नवीन सभासदांचे मनःपूर्वक स्वागत.

लॉकडाऊन काळात सुरुवातीला जी वेबिनार मालिका आयोजित करण्यात आली त्यास मिळालेला प्रतिसाद व त्यातून झालेला फायदा याचा विचार करता ही वेबिनार मालिका भविष्यात पुन्हा सुरू करण्यात येणार असून, पूर्वीप्रमाणे दर दोन-तीन दिवसांऐवजी महिन्यातून किमान दोन वेबिनारचे आयोजन करण्यात येणार असून त्यासाठी अनेक मार्गदर्शक 'महाराष्ट्रपक्षीमित्र'साठी व्याख्यान देण्यास तयार आहेत. त्याचा कार्यक्रम लवकरच जाहीर करण्यात येईल.

'महाराष्ट्रपक्षीमित्र'तर्फे दिले जाणारे चार पुरस्कार बाबतची माहिती या अंकात देण्यात आली असून यासाठीचे प्रस्ताव ३० सप्टेंबरपर्यंत पाठवावे लागणार आहेत. या पुरस्कारासाठी यावर्षीसुद्धा आपल्याला प्रायोजकत्व मिळालेले असून, यासाठी कायमस्वरूपी निधी उभारण्याचा संस्थेचा मानस असून त्यासाठी दानदात्यांना आवाहन करण्यात येत आहे.

आपल्या अंकाचे 'पक्षीमित्र' हे शिर्षक पूर्वी 'पक्षीमित्र' असे लिहिले जात असे, परंतु अनेकांनी यापूर्वी केलेल्या सूचनांचा विचार करून, रेवदंडा येथे झालेल्या कार्यकारिणी सभेत या शीर्षकात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून आता हा शब्द सर्वच ठिकाणी 'पक्षिमित्र' असा लिहिला जाणार आहे. मागील अंकाच्या मुखपृष्ठावर प्रथम तसा बदल करण्यात आला होता.

महाराष्ट्र राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाचे शासनातर्फे नुकतेच गठन करण्यात आले असून यामध्ये सदस्य म्हणून 'महाराष्ट्रपक्षीमित्र'चे माजी अध्यक्ष श्री. भाऊ काटदरे यांची नियुक्ती झाली आहे. तसेच आपले जेष्ठ सदस्य व ३२ व्या महाराष्ट्रपक्षीमित्र संमेलनाचे संमेलनाध्यक्ष श्री. किशोर रिठे सुद्धा या मंडळावर तिसऱ्यांदा नियुक्त झाले आहेत. आजीवन सदस्य असलेले युवा कार्यकर्ता श्री. बंडू धोतरे यांची 'इको प्रो'ही संस्था व आजीवन सदस्य श्री. यादव तरटे व श्री. अनुज खरे हे सुद्धा या मंडळावर नियुक्त झाले आहेत. 'महाराष्ट्रपक्षीमित्र'साठी ही निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे. या सर्वांचे 'महाराष्ट्रपक्षीमित्र'तर्फे मनःपूर्वक अभिनंदन.

कोरोनाच्या संकटावर मात करण्यासाठी आपण सर्वजन बांधील आहोत. काही जण घरी राहून तर काही जन कामास पुन्हा सुरुवात करून, योग्य ती काळजी घेऊन, सामाजिक अंतर पाळून या संकटावर मात करीत आहात. सुरक्षित रहा, सावध रहा!

धन्यवाद!

- डॉ. जयंत वडतकर
अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षिमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
९८२२८७५७७३

# ‘महाराष्ट्र पक्षिमित्र’तर्फे तज्ज्ञांच्या व्याख्यानांची ऑनलाईन मालिका टाळेबंदीच्या काळात पक्षी अभ्यासक व निसर्गप्रेमींसाठी २३ व्याख्यानांची मेजवानी

डॉ. जयंत वडतकर

कोरोनाच्या संकटामुळे अचानक लागलेल्या टाळेबंदीच्या काळात निसर्गप्रेमींचे जंगलात निसर्ग भ्रमंतीला किंवा तलावांवर पक्षी बघायला जाणे बंद झाले होते. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी मानवाचा हस्तक्षेप कमी झाल्याने अनेक ठिकाणी पक्षी रस्त्यावर, गावात, घरात येताना दिसले. नागरिकांमध्ये पक्ष्यांविषयी उत्सुकता निर्माण होताना दिसत होती. काही पक्षिनिरीक्षक आपल्या परिसरातील पक्ष्यांच्या नोंदी करून ‘ई–बर्ड’ या संकेतस्थळावर टाकत होते. या टाळेबंदीच्या काळात पक्ष्यांविषयी सखोल व शास्त्रीय माहिती पक्षिमित्रांना, निसर्गप्रेमींनी व महाराष्ट्रपक्षीमित्र सभासदांना व्हावी या दृष्टीने ‘महाराष्ट्र पक्षीमित्र’तर्फे पक्षी अभ्यासकांच्या व पक्षी तज्ज्ञांच्या व्याख्यानांची मालिका सुरू करण्यात आली होती. तज्ज्ञांचे या विषयावरील मराठी भाषेतील व्याख्यानांचा महाराष्ट्रातील हा पहिलाच उपक्रम होता. त्यास सर्वच स्तरातून भरघोस प्रतिसाद लाभला. त्यानंतर या उपक्रमाचे अनुकरण करीत ठिकठिकाणच्या अनेक संस्थांनीसुद्धा अशा ऑनलाइन व्याख्यानांचे आयोजन केले.

‘महाराष्ट्र पक्षीमित्र’तर्फे आयोजित या व्याख्यानांच्या मालिकेत आजवर एकूण २३ व्याख्याने ऑनलाइन पद्धतीने पार पडली असून या प्रत्येक व्याख्यानास पूर्ण क्षमतेने श्रोत्यांची उपस्थिती मिळत होती. सुरुवातीला १०० श्रोत्यांची क्षमता असल्याने, त्यापेक्षा जास्त श्रोत्यांना प्रवेश सुद्धा मिळू शकत नाही, असे चित्र बघावयास मिळत होते. त्यानंतर, Bird Count India कडून ‘महाराष्ट्र पक्षीमित्र’ला ZOOMची लिंक उपलब्ध करून दिल्याने पुढील वेबिनार मध्ये जास्त लोकांना सहभागी होता आले.

आजवर या व्याख्यानमालेत विविध विषयांवर एकूण २३ व्याखाने पार पडली, त्यामध्ये एकूण २८०४ पक्षी अभ्यासक तथा निसर्गप्रेमी, सभासद यांनी या व्याख्यानांचा लाभ घेतला.

| क्र. | तज्ज्ञ व्याख्याते | आयोजन दिनांक | संस्था | वेबिनारचा विषय |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. राजू कसंबे | १० एप्रिल २०२० | बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी | पक्षीनिरीक्षणाची सुरुवात आणि पक्ष्यांची ओळख |
| २ | श्री. नंदकिशोर दुधे | १२ एप्रिल २०२० | बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी | पक्ष्यांची ओळख आणि नोंदणी |
| ३ | श्री. किरण मोरे | १४ एप्रिल २०२० | पक्षी अभ्यासक, वेक्स अमरावती | माळरानावरील चंडोल पक्षी ओळख आणि प्रजननाचा अभ्यास |
| ४ | कु. पूजा पवार | १६ एप्रिल २०२० | बर्ड काउंट इंडिया, बंगळूरू | प. घाटातील धनेश प्रजातींचे संवर्धन व त्यांचे महत्त्व |
| ५ | श्री. सतीश गोगटे | १७ एप्रिल २०२० | ज्येष्ठ सदस्य, पक्षीमित्र, नाशिक | नांदूर मध्यमेश्वर या रामसर स्थळावर स्थलांतरित पक्षी जास्त का येतात? |
| ६ | श्री. शरद आपटे | १८ एप्रिल २०२० | ज्येष्ठ सदस्य, पक्षीमित्र, सांगली व पक्षी आवाज तज्ज्ञ | पक्ष्यांचा आवाज हीच पक्ष्यांची भाषा |
| ७ | कु. प्रतीक्षा कोतुळे | २० एप्रिल २०२० | पक्षी अभ्यासक, नाशिक | गिधाडांचे पुनर्वसन आणि सुरक्षित अधिवास निर्मिती |
| ८ | प्रा. डॉ. गजानन वाघ | २२ एप्रिल २०२० | कार्यवाह, महाराष्ट्र पक्षीमित्र (अमरावती) | पाणथळ ठिकाणे चिखलपक्षी आणि त्यांची ओळख |
| ९ | डॉ. जयंत वडतकर | २४ एप्रिल २०२० | अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षीमित्र (अमरावती) | रानपिंगळा : पुनर्शोध आणि सद्यःस्थिती |
| १० | डॉ. संदीप साखरे | २६ एप्रिल २०२० | पक्षी अभ्यासक, अकोला | माळटिटवीचे जीवनचक्र |
| ११ | श्री. मनोज बिंड | २८ एप्रिल २०२० | पक्षी छायाचित्रकार, अमरावती | पक्ष्यांचे छायाचित्रण : काही टिप्स आणि ट्रिक्स |

| क्र. | तज्ज्ञ व्याख्याते | आयोजन दिनांक | संस्था | वेबिनारचा विषय |
|---|---|---|---|---|
| १२ | डॉ. राजू कसंबे | ३० एप्रिल २०२० | बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी | भारतीय राखी धनेशाचा प्रजनन काळातील अभ्यास |
| १३ | श्री. सतीश गोगटे | ०१ मे २०२० | पक्षी अभ्यासक,नाशिक | रामसर दर्जाची पाणस्थळे आणि पहिले रामसर स्थळ नांदूर मध्यमेश्वर |
| १४ | डॉ. गिरीश जठार | ०५ मे २०२० | बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी | आपली पक्षी निरीक्षणे व नोंदी कशा प्रकाशित कराव्यात? |
| १५ | श्री. अविनाश भगत | ०८ मे २०२० | पक्षी अभ्यासक, ठाणे | भारतातील पक्षी पर्यटन |
| १६ | श्री. दिलीप विरखडे | १३ मे २०२० | बहार नेचर फाउंडेशन, वर्धा, विदर्भ समन्वयक, म.प. | 'बहार'चा नाविन्यपूर्ण उपक्रम : शहर पक्षी निवडणूक लिम्का बुकात |
| १७<br>१८ | श्री. लक्ष्मिकांत नेवे | ११ मे २०२० | पक्षी अभ्यासक, भुसावळ | ठराविक अधिवासातील पक्षी नोंदणीची आवश्यकता |
| | डॉ. प्रीती बंगाळ | १५ मे २०२० | पक्षी संशोधक, पुणे | पक्ष्यांच्या थव्यांना समजून घेऊ या |
| १९ | श्री. किशोर रिठे | १८ मे २०२० | ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक, सातपुडा फाउंडेशन | पक्षी संवर्धन : आजची स्थिती आणि गरज |
| २० | डॉ. बहार बाविस्कर | २१ मे २०२० | वाइल्ड सी.ई.आर., नागपूर | पक्षी बचाव कार्य : पुनर्वसनासाठी मार्गदर्शक प्रणाली |
| २१ | श्री. कौस्तुभ पांढरीपांडे | २५ मे २०२० | Foundation for Economic & Ecological Development | विदर्भाचा पर्यावरणीय इतिहास आणि तणमोर |
| २२ | कु. पूजा पवार | १६ एप्रिल २०२० | बर्ड काउंट इंडिया, बंगळूरू | ई-बर्ड पक्षी नोंदणी |
| २३ | मा. अभिमन्यू काळे, आयएएस | ०१ जून २०२० | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | पक्षी संवर्धनासाठी वाचवूया बांधावरील झाडे : एक जिल्हाधिकारी यांचा यशस्वी प्रयोग |

या व्याख्यानमालेचे निमंत्रक व समन्वयक म्हणून महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी ही जबाबदारी सांभाळली. या आयोजनासाठी बर्ड काउंट इंडिया, बंगळूरूच्या कु. पूजा पवार, मित्तल गाला, म.प.चे प्रा. गजानन वाघ, श्री. किरण मोरे, श्री. नंदकिशोर दुधे यांचे सहकार्य लाभत असून ही सर्व व्याख्याने झूम या ऑनलाइन ॲप वापरून घेतली जात आहेत. यासाठी झूम ॲपची लिंक बर्ड काउंट इंडिया, बंगळूरू येथील डॉ. सुहेल कादर यांनी उपलब्ध करून दिली होती.

आपल्या ह्या वेबिनार मालिके नंतर अनेक ठिकाणांहून ऑनलाइन व्याख्यानांची गर्दी वाढल्याने तूर्तास आपण थांबण्याचा निर्णय घेतला असून, पुन्हा लवकरच ही व्याख्यानांची मालिका पुन्हा सुरू करण्यात येईल. यामध्ये आणखी नवीन विषयांवर तज्ज्ञ वक्ते असणार आहेत. ही व्याख्याने आपण महिन्यातून दोन किंवा तीन एवढीच आयोजित करू. त्यांना सुद्धा आपला प्रतिसाद मिळेलच.

धन्यवाद!

- डॉ. जयंत वडतकर
अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षिमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
९८२२८७५७७३



# पक्षिजीवनातील रहस्यकथा



किशोर रिठे

मानवी जीवनाच्या नागमोडी वळणांवर आपण अपेक्षित तसेच अनपेक्षित अश्या अनेक गोष्टी अनुभवत असतो. खरे म्हणजे आपल्या मेंदूला पूर्वीच्या अनुभवावरून काही गोष्टी, घटना तसेच त्यांचे निकाल ठरावीक पद्धतीने अपेक्षित असतात. त्यामुळे आपल्या अश्या गोष्टींबद्दल किंवा त्या घडल्यानंतरच्या निकालांबाबत ठरावीक अपेक्षा असतात. परंतु आपल्या मेंदूच्या विचार करण्याच्या पद्धतीमधील मर्यादांमुळे जेव्हा अनपेक्षित निकाल येतात तेव्हा मात्र आपण आश्चर्यचकित होतो.

पक्ष्यांच्या जीवनामध्येही मानवी जीवनाप्रमाणे काही उलथापालथी होत असाव्या. बऱ्याचदा पक्षिअभ्यासकांना त्या दिसूनही येतात. परंतु पक्षिअभ्यास करण्यासाठी लागणारा भरपूर वेळ व विविध अधिवासांमध्ये अभ्यास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पुरेश्या संधी पक्षिमित्रांना मिळणे कठीण असते. आजकालच्या धकाधकीच्या आयुष्यामुळे तर हे दुर्लभ होऊन बसले आहे. त्यामुळे पक्षी जीवनामध्ये घडणाऱ्या अनेक गोष्टींपैकी काही निवडकच घटना पक्षिमित्रांच्या वाट्याला येतात. मग अश्या गोष्टी जेव्हा पक्षिअभ्यासकांना अनुभवायला मिळतात तेव्हा मात्र त्या रहस्यमय, अदभूत किंवा दुर्मीळ ठरतात.

पण अश्या गोष्टींना रहस्यमय, गूढ किंवा दुर्मीळ असे म्हणण्यापेक्षा ती गोष्ट आपल्याला जरी आज किंवा पहिल्यांदाच दिसली असली तरी ती निसर्गात बऱ्याचदा घडत असावी असे पक्षितज्ज्ञ श्री. पी.एम. लाड यांना वाटते. 'आपल्याला पक्ष्यांच्या जीवनाबद्दल काहीच माहीत नाही' असे स्पष्ट मत पक्षितज्ज्ञ श्री. पी.एम. लाड मांडतात. पक्षितज्ज्ञ श्री. पी.एम. लाड हे पूर्वीच्या एकसंध मध्य प्रदेश राज्याचे सेवानिवृत्त मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) आहेत. पण त्यांची ही ओळख पुरेशी नाही. त्यांचा पक्ष्यांचा असणारा प्रचंड अभ्यास हा खुद्द पक्षितज्ज्ञ डॉ सालीम अली यांनाही परिचित होता. त्यामुळेच डॉ. सालीम अली यांचा जेव्हा मध्यप्रदेशमधील पक्षिअधिवासांमध्ये दौरा असायचा तेव्हा कधीही मुंबईहून कार्यक्रम यायचा नाही. तो आखण्याची पूर्णतः मुभा श्री. लाड साहेबांना असायची. सेवानिवृत्तीनंतरही पक्षिनिरीक्षण, छायाचित्रण व पक्षिअभ्यासाचा छंद जोपासणारे ते भारतातील कदाचित एकमेव वनाधिकारी असावेत.

मला श्री लाड साहेबांसोबत मध्यभारतातील जंगलांमध्ये पक्षी अभ्यास करण्याची भरपूर संधी मिळाली. दिवसभराच्या पक्षी अभ्यासानंतर रात्री 'दाल-रोटी'चे साधे जेवण संपले की मग आमच्या पक्षिजीवनावरील गप्पांचा फड रंगायचा. त्यातून माझ्यासाठी आजपर्यंत रहस्यमय ठरलेल्या अनेक गोष्टींचे गूढ उकलले जायचे. सेवानिवृत्तीनंतर मिळालेल्या पैशांतून त्यांनी ८०० मी.मी. टेलीलेन्स व कॅमेरा घेतला. तो भव्य लेन्स वाहून नेण्यासाठी त्यांनी चक्क मारुती कंपनीची रुग्णवाहिकाच खरेदी केली. विशेष म्हणजे संपूर्ण भारतभर ती गाडी ते स्वतःच चालवायचे. ती पांढऱ्या रंगाची रुग्णवाहिका माझ्या घराजवळ आली की, समजायचे साहेब काही तरी विशेष मोहिमेवर निघाले आहेत. एकदा अशीच त्यांची गाडी अमरावतीला आली. एक दीड तासांच्या चर्चेनंतर श्री. लाड साहेबांनी मला प्रश्न विचारला. तुला हरियाल या पक्ष्यांची कितपत माहिती आहे? मी भाबडेपणाने सांगू लागलो. हरियल हा फलहारी (फ्रुगीहोरस) पक्षी आहे. वडाच्या झाडाला लाल रंगाची फळ धरली की त्यावर फळं खाताना तो अगदी शहरांमध्येही दिसतो. एरवी वड, पिंपळ यासारख्या भव्य वृक्षांच्या शेंड्यावर तो बसलेला

पाहायला मिळतो. महाराष्ट्र राज्याचा तर तो राज्यपक्षी आहे. माझं संपूर्ण सांगून होईपर्यंत श्री.लाड साहेब शांत होते. मग एक दीर्घ शांतता पसरली. आता मी लाड साहेब काय बोलणार हे ऐकण्यासाठी आतूर झालो होतो. साहेबांनी पुन्हा एक प्रश्न टाकला, हरियल पक्षी झाडांवर तू पाहिले आहेस पण त्यांना तू कधी जमिनीवर उतरलेले पहिले काय? मी नकारार्थी मान डोलविली. हरियल पक्षी विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यातील एका ठिकाणी चक्क जमिनीवर उतरतात. ते जमिनीवर का उतरतात हे जाणून घेणे खूप महत्त्वाचे असणार आहे. मी तिथे जाण्याचे ठरविले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात एका गावानजीक हे हरियाल जमिनीवर उतरतात अशी माहिती कुठून तरी त्यांना मिळाली होती.

पुढच्या भेटीत मी श्री. लाड साहेबांना त्यांच्या हरियल दौऱ्याबद्दल विचारले. वरील माहिती मिळाल्यानंतर श्री. लाड साहेबांनी त्या ठिकाणाचा पत्ता लावला. हरियाल पक्ष्याचं जमिनीवर उतरण्याचे कारणही त्यांनी शोधून काढले. त्या ठिकाणी जमिनीमध्ये खूप क्षार (मीठ) असल्याचे श्री. लाड साहेबांच्या लक्षात आले. अगदी जंगलामध्ये नैसर्गिक चाटण असतात तसे. किती महत्वपूर्ण निरीक्षण होते ते? पण त्यासाठी अशी जिज्ञासा व ती गोष्ट शोधून काढण्यासाठी लागणारी चिकाटी आवश्यक असते हे दिसून येते.

एकदा साहेबांची गाडी पुन्हा माझ्याकडे अमरावतीला आली. यावेळी त्यांनी प्रश्न टाकला तो एका विशिष्ठ जातीच्या वडपेकर म्हणजे लाकुडतोड्या पक्ष्याबद्दल, मेळघाटमध्ये 'लेसर यलोनेप वूडपेकर (Picus chlorolophus) कधी तुला दिसला का? मी होकारार्थी उत्तर दिल्यावर त्यांचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट झळकत होता. मी त्यांना मेळघाटातील संभाव्य ठिकाण सांगितले. मला त्याचे फोटो घेणे मात्र कधी जमले नव्हते. आता ते शक्य होणार होते. आता जोपर्यंत ते स्वतः त्याला पाहणार नव्हते तोवर साहेब माझ्यावर विश्वास ठेवणार नाही हे मला अनुभवावरून माहीत होते. आता मी साहेबांना तो दिसावा यासाठी मनोमन प्रार्थना करू लागलो. माझ्या मनाची कालवाकालव पाहून साहेब म्हणाले 'तू जर त्याला तेथे पहिले असेल तर तो मला त्या परिसरात दिसणार नाही असे होणे शक्यच नाही'. एवढे बोलून साहेब मेळघाटकडे रवाना झाले. सुदैवाने त्यांना तो दिसला.

चार दिवसांनी साहेब केवळ या पक्ष्याच्या दर्शनाची 'गुड न्यूज' द्यायला अमरावतीत आले. त्यावेळी त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. मला बरे वाटले. 'मी तो फक्तच पाहिला नाही तर एक विशेष गोष्ट यावेळी पाहायला मिळाली. ती 'ऐकू तूलाही मजा वाटणार! ती सांगण्यासाठी म्हणून खास मी इथे आलो आहे', साहेब बोलले.

'उन्हाळ्याचे दिवस होते. मी कळंब वृक्षाच्या खाली असणाऱ्या एका पाणवठ्यापासून वर चढणाऱ्या डोंगराच्या पायथ्याशी बसलो होतो. उन्हाळ्यामुळे पाणवठ्यावर पक्ष्यांची भरपूर रेलचेल होती. त्यात मला हा वूडपेकर दिसला. पण पहिल्यांदा फारच कमी वेळासाठी येऊन तो दिसेनासा झाला. मी कॅमेरा सज्ज असूनही फोटो काढू शकलो नाही. मग घड्याळात साडेचार-पाच वाजले असावेत. सूर्य अस्ताला जात होता. अजूनही ऊन असले तरी दुपारच्या तापमानापेक्षा तुलनेने तापमान खूपच कमी झाले होते. अशात माझी नजर समोरच्या कळंब वृक्षाच्या खोडावर गेली, एका खाचेमधून या वृक्षाच्या आकुंचित होण्यामुळे अचानक रस (चिक) बाहेर येवू लागला. मला त्याचा फोटो घेण्याचा मोह झाला, आणि काय आश्चर्य! त्या रसाचा थेंब बाहेर आल्याबरोबर या वूडपेकरने क्षणात त्यावर झेप घेऊन तो चोचीत टिपला! मला त्या वृक्षाच्या रसाचा थेंब चोचीत घेऊन या वूडपेकरचे फोटो मिळालेत. आहे की नाही निसर्गात मजा!' हे एकूण मीही क्षणभर अचंबित झालो! माझ्या अंगावर काटा उभा झाला! पक्ष्याना इतकं ज्ञान कुठून आले असेल? निसर्गाच्या पोटात अशी कितीतरी रहस्यं दडली असावीत, नाही?

एकदा साहेब राजस्थानातील अजमेर जवळ तनमोरांची निरीक्षणे नोंदविण्यासाठी जात होते. त्यांच्या सोबत भोपाळचे दोन पक्षिमित्र होते. 'इथे अजूनही २०० ते ३०० तनमोर पाहायला मिळतात. आमच्या प्रवासात आम्ही एका ठिकाणी ४–५ तुर्रेवाला चंडोल म्हणजेच 'क्रेस्टेड लार्क' हे पक्षी पहिले. माझ्यासोबतच्या पक्षिमित्रांनी त्यांचे ४–५ फोटो घेतले. काढलेले फोटो रात्री पाहत असताना त्याला लार्क पक्ष्याच्या आखूड शेपटीच्या भागामध्ये एका मुलीची प्रतिमा स्पष्ट दिसत होती. आम्ही तो फोटो कितीतरीदा पहिला. विशेष म्हणजे सर्वच फोटोंमध्ये ती प्रतिमा तशीच उमटली होती. दुसऱ्या दिवशी आम्ही ती घटना तिथल्या लोकांना सांगितली, तर लोकांना त्याचं अजिबात आश्चर्य वाटलं नाही. उलट त्यांची प्रतिक्रिया ऐकून आम्ही गार झालो. लोकांच्या मते त्या ठिकाणी कोणताही प्राणी, पक्षी गेल्यास काहीतरी विलक्षण घडते. काही दिवसांपूर्वी तेथून एक घोडागाडी जात होती. घोडागाडी त्या विशिष्ठ ठिकाणी पोहोचताच घोडा बिथरला. तो उधळून पळू लागला व चक्क ४–५ किलो मीटर अंतरावर जाऊन थांबला! आता याला काय म्हणावे? आम्ही अंधश्रद्धाळू नसूनही हा फोटोचा विचित्र अनुभव आम्ही स्वतः घेतला!'

मध्यभारतातील जंगलांमध्ये घुबडांच्या अभ्यासासाठी आम्ही दोघांनी खूप भटकंती केली. रानपिंगळा (Forest owlet) सोबतच इतरही घुबडांवर त्यामुळे मनोरंजक अश्या गोष्टी अनुभवायला मिळाल्या. अश्याच एका प्रसंगी शृंगी घुबड (ग्रेट हॉर्नड औल) व मोटल्ड वूड औल यांच्या मध्ये रंगलेले वाकयुद्ध अनुभवायला मिळालं. त्यावेळी मोटल्ड वूड औल या घुबडाचा प्रतिस्पर्ध्याशी होणाऱ्या द्वंद्वाच्या वेळी एरवीपेक्षा वेगळाच (हिस्सिंग) कॉल असतो हे ध्यानात आले. पक्ष्यांचे सामान्य आवाज व युद्धाच्या वेळी किंवा इतर प्रसंगांमध्ये काढलेले वेगळे आवाज हे पण खूप रंजक असते.

तर निसर्गात पक्षिजीवनामध्ये अशी अनेक रहस्ये आहेत. ती उलगडण्यासाठी आपण निसर्गात जास्त वेळ घालविण्याची तेवढी गरज आहे.



श्री. पी.एम. लाड



श्री. पी.एम. लाड सोबत किशोर रिठे

किशोर रिठे
अध्यक्ष, सातपुडा फाऊंडेशन तथा
जेष्ठ वन्यजीव अभ्यासक, अमरावती
९४२२१५७१२३

# रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या पक्षी प्रजाती - एक अभ्यास



प्रा.डॉ.गजानन वाघ

अलीकडे रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या वाढत चाललेली असून त्यातून पाळीव प्राणी, वन्यप्राणी आणि पक्षीसुद्धा सुटलेले नाही. रस्त्यांचे दिवसेंदिवस दाट होत असलेले जाळे आणि त्या रस्त्यांवरून जाणाऱ्या वाहनांची वाढती संख्या, त्या वाहनांचा अतीवेग, त्यांच्या एल.इ.डी लाईटचा रात्रीला पडणारा लख्ख प्रकाश आणि रस्त्यांची वाढत चाललेली रुंदी या सर्व बाबी काही पक्षी प्रजातींच्या मुळावरच उठलेल्या आहेत. अशी माहिती नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाकडून प्राणिशास्त्र विषयात आचार्य पदवी मिळवलेले अचलपूर येथील आपले पक्षिमित्र तथा जगदंबा महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विषयाचे प्राध्यापक श्री.अमोल रावणकर यांच्या संशोधनातून पुढे आलेली आहे.

अमोल रावणकर यांनी "Evaluation of Avian Carcasses from Amravati District and their Molecular Systematics (अमरावती जिल्ह्यामध्ये मृत्युमुखी पडणारे पक्षी व त्या मागील कारणांचा शोध आणि त्यांचा जनूकीय अभ्यास)' या विषयावर त्यांनी संशोधन केलेले आहे.

अमरावती जिल्ह्यामध्ये मृत्युमुखी पडणारे विविध प्रजातींचे पक्षी आणि त्यामागील कारणे यावर सतत तीन वर्षेत्यांनी अभ्यास केला असून एकूण १३ मृत्यूंमागील कारणे समोर आली आहेत. यामध्ये रस्ता अपघातात मृत्यू, पक्ष्यांची शिकार व विक्री, उच्च दाबाच्या विद्युत तारांच्या संपर्कात आल्यामुळे मृत्यू, विषमिश्रित अन्न व पाणी प्यायल्याने मृत्यू, अवकाळी वादळी पाऊस आणि गारपीट यामुळे मृत्यू, मासे पकडण्यासाठी लावलेल्या जाळ्यात अडकून मृत्यू, पतंगासाठी वापरण्यात येणाऱ्या नायलॉन मांज्यामुळे अपघात होऊन मृत्यू, शेतामध्ये वापरण्यात येत असलेले कीटकनाशक यामुळे मृत्यू, पीक संरक्षणासाठी गावातील लोकांकडून मारले जाऊन होणारा मृत्यू, उन्हाळ्यातील तापमानामुळे होणारा मृत्यू, इमारतीवरील काचांवर आदळून होणारा मृत्यू, शिकारी प्राणी तसेच शिकारी पक्षी यांचेकडून मारले जाऊन होणारे मृत्यू, तसेच अन्नपाण्याविना होणारे मृत्यू आणि विविध आजार यामुळे होणारे मृत्यू.

एकूण ८२ प्रजातींचे पक्षी या विविध कारणांनी अमरावती जिल्ह्यामध्ये मृत्युमुखी पडल्याची नोंद त्यांनी या अभ्यासात घेतलेली आहे. या सर्वांमध्ये रस्ता अपघाताने मृत्युमुखी पडणाऱ्या पक्षी प्रजातींची सर्वात जास्त संख्या आहे. त्यामध्ये ५५ पक्षी प्रजातींचा समावेश आहे. तीन वर्षात एकूण १९१० पक्षी रस्ता अपघाताने मृत्युमुखी पडलेले आढळून आलेले आहेत. जवळपास २ ते ३ पक्षी दर ३० कि.मी.च्या अंतराने मृत्युमुखी पडतात असे आढळून आलेले आहे. यासाठी त्यांनी अमरावती ते चांदूर रेल्वे राखीव जंगलातून जाणारा, अमरावती ते परतवाडा शेती भागातून जाणारा आणि परतवाडा ते सेमाडोह मेळघाटातील संरक्षित जंगलातून जाणाऱ्या अशा तीन राज्य महामार्गांचा अभ्यास केलेला आहे.

यामध्ये भारद्वाज, लाल-बुड्या बुलबुल, ठिपकेवाला पिंगळा, साळुंकी, रातवा, होला, राखी वटवट्या,रान वटवट्या,नीलपंख,सातभाई,कोकीळ,चीरक,शिंपी, गप्पीदास, कावळा व चातक या पक्षी प्रजातींच्या पक्ष्यांचे प्रमाण इतर नोंद केलेल्या पक्षी प्रजातींपेक्षा अधिकच आढळून आलेले आहे. घुबड, ठिपकेवाला पिंगळा, आणि रातवा यासारख्या निशाचर पक्ष्यांसाठी वाहनांच्या एल.इ.डी लाईटचा लख्ख प्रकाश कर्दनकाळ ठरत आहे.

जिल्ह्यातील काहीभागातून जाणाऱ्या उच्च दाबाच्या विद्युत तारांमुळे घुबड, क्रौंच, करकोचे आणि मोठे स्थलांतरित बदक मृत्यू पावल्याची नोंद घेतलेली आहे. अवकाळी वादळी पाऊस आणि गारपीट यामुळे पोपट, ढोकरी,बगळे,पाणकावळे आणि कावळे मोठ्या संख्येने मृत्युमुखी पडलेले आढळून आलेले आहेत. याचे कारण असे की हे पक्षी हजोरांच्या संख्येने उंच अशा मोठ्या झाडावर रात्री बसतात त्याला 'रातथारा' असे म्हणतात. त्यामुळे अशा पक्ष्यांची एकाच वेळी मोठ्या संख्येने मृत्युमुखी पडल्याची नोंदसुद्धा त्यांनी अभ्यासादरम्यान घेतलेली आहे.

मृत्युमुखी पडणाऱ्या पक्ष्यांचा प्रजातींचा जनूकीय अभ्यास (DNA Barcoding) सुद्धा करण्यात आलेले आहे. विशेष म्हणजे यामध्ये भारतातून ०६ पक्ष्यांच्या प्रजातींची प्रथमच माहिती जनूकीय बँकेमध्ये (Gene Data Bank) जमा करण्याचा मान श्री. अमोल रावणकर यांना मिळालेला आहे.

या अगोदरसुद्धा रस्ता अपघाताने मृत्युमुखी पडणाऱ्या पक्ष्यासंबंधी काही देशांमध्ये शास्त्रीय अभ्यास झालेला आहे. परंतु त्यामानाने भारतामध्ये फारच कमी प्रमाणात यावर अभ्यास करण्यात आलेला आहे. विशेष म्हणजे भारद्वाज, लाल-बुड्या बुलबुल, ठिपकेवाला पिंगळा, रातवा, साळुंकी, नीलपंख, सातभाई व चातक या पक्षीप्रजाती रस्ता अपघातात इतक्या जास्त प्रमाणात मृत्युमुखी पडतात यांची नोंद शास्त्रीय पद्धतीने घेतली गेलेली नव्हती. त्यामुळे अशा प्रकारचा शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास हा केवळ अमरावती जिल्ह्यासाठीच महत्त्वाचा नसून महाराष्ट्र राज्य आणि संपूर्ण भारतातील पक्षी जैवविविधतेच्या दृष्टीने मोलाचा ठरणार आहे. या अभ्यासाला देश-विदेश पातळीवर अधिकच महत्त्व प्राप्त होईल व संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा संदर्भग्रंथ म्हणून उपयोग होईल यात शंका नाही.

शिवाय भारद्वाज, लाल-बुड्या बुलबुल, ठिपकेवाला पिंगळा, साळुंकी, रातवा, होला, राखी वटवट्या, रान वटवट्या, नीलपंख, सातभाई, कोकीळ, चीरक, शिंपी, चातक, तसेच इतर नोंद केलेल्या पक्षी प्रजातींचे रस्ता अपघातात मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण कसे कमी करता येईल यावर आणखी संशोधन आणि शासकीय पातळीवर उपाययोजनांची गरज आहे नाहीतर या पक्षी प्रजाती येणाऱ्या काळात अतिशय दुर्मीळ होतील किंबहुना नष्ट होतील अशी भीती आहे.

या शोधप्रबंधाचे मार्गदर्शक म्हणून मला या संशोधन कार्यासाठी हातभार लावता आला आणि अमरावती जिल्ह्याच्या वेगवेगळ्या अधिवासातून जाणाऱ्या तीन राज्य महामार्गांमुळे पक्ष्यांच्या कोणकोणत्या प्रजाती नेमक्या मृत्युमुखी पडतात त्याचबरोबर आणखी कोणत्या कारणांनी पक्ष्यांचे मृत्यू होतात यावरसुद्धा अभ्यास करता आला याचा मनस्वी आनंद आहे. या संशोधनातून बाहेर आलेली माहिती फक्त शोधनिबंध वाचकांपर्यंत मर्यादित न राहता आपल्या सामान्य पक्षिमित्रांपर्यंत जावी या उद्देशानेच ही माहिती आपल्यापर्यंत पोहचवीत आहोत.






प्रा.डॉ.गजानन वाघ
सहयोगी प्राध्यापक,
श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती,
पक्षी अभ्यासक तथा सदस्य जैवविविधता समिती
९८२२२०४०७०

# गवती वटवट्या



लक्ष्मीकांत राजाराम नेवे

माझ्या आजवरच्या पक्षिनिरीक्षणाने मला बरेच शिकविले. माझ्या नियमित परिसर पक्षिनिरीक्षणाने मला नवनवीन पक्षिविश्व बघावयास मिळाले. त्यातूनच महाराष्ट्राला स्मरला गवती वटवट्या.

मला दिसलेल्या गवती वटवट्याचे प्रमाणित नाव Striated GrassBird आणि शास्त्रीय नाव Megalurus Palustris आहे. महाराष्ट्रात  वापरण्यात येणाऱ्या पक्ष्यांच्या मराठी भाषेतील प्रमाणित यादीत यास स्थान नाही.

त्यामुळे मी यास गवती वटवट्या किंवा पट्टेवाला वटवट्या म्हणतोय. Striated चा अर्थ पट्टे असलेला असा होतो. पक्षितज्ज्ञांनी या वटवट्याचेही मराठीत बारसे करणे अपेक्षित आहे.

गवती (पट्टेवाला) वटवट्या या नावातच हा पक्षी गवताळ प्रदेशात रहाणारा असावा असे समजते, ते खरे ही आहे. पण याचे शास्त्रीय नाव याचा खराखुरा अधिवास सांगते. Megalurus Palustris म्हणजे लांब शेपटीचा पाणथळ गवती परिसरात अधिवास करणारा, असे म्हणता येईल. याचाच अर्थ हा पक्षी गवताळ माळरानात सापडत नाही.

आपले पक्षिनिरीक्षण लहानपणापासूनच सुरू होते आणि माझेही तसेच झाले. पण शिक्षण, नोकरी, छोकरी, मुलं यातून वेळ काढत हे चालूच होते. उघड्या डोळ्यांनी केलेली नियमित पक्षिनिरीक्षणे नंतर कधीतरी कामात येतील यांची कल्पना नसतानाच कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात रूजू झालो. आजूबाजूचा कालव्यांचा परिसर, दलदल आणि चारही बाजूला पसरलेली जंगले मला शांत बसू देत नव्हती. जंगल भ्रमंतीसह माझी पक्षिनिरीक्षणाची ओढ वाढत गेली. पक्षीमित्रांची ओळख होत असतानाच भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर येथे बदली झाली. मी माझ्या लहानपणच्या तापीखोऱ्यात परतलो होतो. सारी जुनी ठिकाणे पुन्हा फिरू लागलो, जेथे माझे लहानपणचे मित्र भेटू लागले; पण आता मी त्यांना नावाने ओळखू लागलो होतो. येथे येताच मी भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर हा परिसर पक्षिअभ्यासासाठी निवडला आणि या अभ्यासातून (पट्टेवाला) गवती वटवट्या मी महाराष्ट्रातील पक्षीमिंत्रासमोर आणत आहे.

(पट्टेवाला) गवती वटवट्याच्या मागावर मी आणि माझी मुलगी दोघे परिसर पक्षिनिरीक्षणे सुरू झाल्यापासूनच होतो. नियमित विविध आधिवासांना भेटी देताना तापी खोऱ्यात Locustellidae म्हणजे कीटक  खाणारा गायक पक्षी आढळला. पण अपूर्ण माहिती आणि संसाधने यामुळे यावर लगेच शिक्कामोर्तब करता आले नाही. ७ डिसेंबर २०१७ ला हा काहीसा नवीन पक्षी झुडपाच्या शेंड्यावर बसून आवाज देत असताना बघताच ऊत्सुकता वाढली. कोण असेल बरं हा? याला ओळखण्यासाठी काय करता येईल म्हणून भ्रमणध्वनीवर त्यांच्या आवाजाचे नमुने घेतले. बऱ्याच पक्षिमित्र आणि अभ्यासकांना ती ऐकविली आणि मिशीवाला गवती वटवट्या असावा असे निष्पन्न निघाले. पण नंतरच्या भेटीत आणि थोड्या अभ्यासानंतर हा तो नव्हेच या निर्णयापर्यंत मी पोहचलो. पुन्हा निरीक्षणे वाढवावी लागणार होती; पण साहेब सहा/आठ महिने उपस्थिती दाखवित नाहीत. म्हणजे वेळखाऊ काम होते. २०१७-१८-१९-२० अशी चार वर्षेमी आणि माझी मुलगी याच्या मागावर होतो.

२०१९ च्या शेवटाला साहेबांच्या उपस्थितीची चाहूल लागली होती; पण खात्री देता येत नव्हती. त्यामुळे ठरावीक अधिवासांना भेटी देण्याचे प्रमाण वाढविले. (पट्टेवाला) गवती वटवट्या असल्याची खात्री झाल्यावर २५ जानेवारी २०२० ला अगदी सकाळी तापीखोऱ्यात पोहचलो. पाच किलोमीटर चा परिसरातील चप्पा चप्पा धुंडाळला आणि अचानक साहेबांचे दर्शन झाले.

आजूबाजूला खोल पाणी आणि दाट पाणगवत /पाणवनस्पतीत हा लपलेला होता. प्रत्येकी वीस–पंचवीस मिनिटांच्या कालावधीनंतर हा बाहेर येत असे आणि मिनीटभर आवाज देऊन पुन्हा नाहीसा होत असे. त्यामुळे सतत वाट बघून छायाचित्रे आणि आवाजाचे नमुने घेणे जिकिरीचे झाले होते. प्रत्येकी वीस मिनिटानंतर फक्त मिनिटभर दर्शनचा लाभ याप्रमाणे पाच तास एकाच जागी उभे राहून छायाचित्रण, चलचित्रण आणि आवाजाचे नमुने घेत राहिलो. दुपारचे दोन वाजलेले, घरून काळजीचे फोन सुरू झाले; पण साहेबरावांनी संमोहित केले होते. एकाच जागी तिष्ठत उभा होतो आणि पाच तासांच्या खात्रीशीर मेहनतीनंतर महाराष्ट्रातील (पट्टेवाला) गवती वटवट्याच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब होणार याची खात्रीही झाली होती.

स्वताःची खात्री झाल्यावर महाराष्ट्रातील पक्षिअभ्यासक, पक्षितज्ज्ञ यांना जमापुंजी सादर करून खातरजमा केली. या वटवट्याच्या जुन्या नोंदी पण कळल्या. निरीक्षणे सुरूच होती. मे –जून महिना उजाडत एकाचे दोन आणि दोनाचे चार अश्या चार वटवट्यांची नोंद एकाचवेळी झाली आहे.

हा गवती वटवट्याच्या भारताच्या उत्तर पूर्व भागात नोंदी आहेत. पण मध्य भारतात आणि त्यातल्यात्यात महाराष्ट्रात याची शइळीव खपवळर Platform नुसार नोंद नसल्याचेही अभ्यासले.

eBird नेही भुसावळच्या तापीखोऱ्यातील (पट्टेवाल्या) गवती वटवट्या च्या आस्तित्वाची आता अधिकृत दखल घेतली आहे.

तर अश्या या २२ ते २५ से.मी. आकाराच्या (पट्टेवाला) गवती वटवट्या – Striated Grassbird – (Megalurus Palustris) ने उत्तरपूर्व भारतासह मुख्यत्वे महाराष्ट्रातही आपल्या आस्तित्वाची नोंद दिली आहे. सोबत दिलेल्या छायाचित्राप्रमाणे आणि नावाप्रमाणे लांबशेपटीचा उथळ पाणलोट क्षेत्रातील पाणगवतात राहणारा हा पक्षी लालसर तपकिरी रंगछटेचा असतो. डोक्यावरही याच रंगाची छटा असते. भुवई पांढरट रंगाची जाड रेषेने व्यापलेली असते. छातीवर बारीक तपकिरी रेषा दिसतात. पाठीच्या भागावर याच तपकिरी काळसर रेषा स्पष्ट आणि जाड होत जातात. वयस्क पक्ष्यांच्या लांब शेपटीवर काळ्या ठसठशीत रेषेच्या भोवताली लालसर तपकिरी पट्ट्यांची सलग रांग असल्याचेही जाणवते, म्हणूनच की काय आंग्लभाषेतील नावानुसार याला पट्टेवाला गवती वटवट्या म्हणावेसे वाटते. याचे नानाविध आवाज ऐकण्याचाही योग आला. त्यांचे मंजुळ गाणे, धोक्याच्या सूचनात्मक आवाजाचे नमुने उपलब्ध झाले आहेत.

IUCN RED LIST –२०१६ नुसार हा गवती वटवट्या LC- Least Concern category मध्ये जरी येत असला तरी IUCN अंदाजे संख्या या विषयावर माहिती उपलब्ध नाही म्हणत आहे. त्यामुळे उत्तरपूर्व भारत आणि भारताच्या पूर्वेकडील देशांमध्ये अस्तित्व असलेला पक्षी महाराष्ट्रात दिसणे आणि तेही औष्णिक विद्युत केंद्राजवळील परिसरात दिसणे ही माझ्या दृष्टीने महत्त्वाची बाब ठरते.

अधिवास तर समजला, संख्येतही वाढ दिसत आहे, त्यामुळे पुढील अभ्यासाची दिशा ठरविता येणार आहे.

अधिवासात असणारे संभाव्य धोक्याविषयी पण बोलता येईल. येथे गाळपेरा भागातील माती विटभट्ट्यांसाठी नेली जाते. रेतीचे उत्खनन केले जाते. जनावरे चारा शोधत पाण्यामध्ये डुंबण्यासाठी येत असतात. याशिवाय मुंगुस, साप, शिकारी व इतर पक्षी यांचेही अस्तित्व या परिसरात आहे. भुसावळ शहरासाठी पाण्याची आवर्तने हतनूरमधून सोडली जातात. त्यावेळी पाण्याची पातळी वाढल्याने गवती वटवट्यास आपली जागा सोडावी लागते.

असा हा पट्टेवाला गवती वटवट्या भविष्यात अजून बरीच गुपितं सांगणार आहे.

-लक्ष्मीकांत राजाराम नेवे
(कनिष्ठ अभियंता, भुसावळ औष्णिक केंद्र, दीपनगर)
पक्षीअभ्यासक, भुसावळ
lakshmikant.bird@gmail.com
८१४९६५९३५३ / ७५८८७४०६६१

तळटीप : कृपया या गवती वटवट्याविषयी कोणा पक्षिमित्रांच्या पूर्वीच्या नोंदी असल्यास संदर्भासह वरील ईमेल वर पाठवाव्यात, ही कळकळीची नम्र विनंती.


लक्ष्मीकांत राजाराम नेवे


लक्ष्मीकांत राजाराम नेवे


लक्ष्मीकांत राजाराम नेवे


लक्ष्मीकांत राजाराम नेवे



# आठवणीतून अशी पाखरे येती ।।

सु. मेजर जयंत कानडे

माझे आजोळ शीर, तालुका गुहागर येथील सुंदर नयन रम्य खेडे आहे. चार बाजूला हिरवेगार डोंगर, नारळी पोफळीच्या बागा, उन्हाळ्यातही भाजीपाला, पावटा इत्यादीने बहरलेली हिरवीगार शेते, पाटातून खळखळणारे पाणी, शेतकऱ्यांचे हाकारे, वानरांची हूपहूप, पक्ष्यांची किलबिल. मागे पुढे अंगण असणारे कौलारू घर, घराजवळ चिकू, पेरू, केळी, पारिजात, गुलाब, शेवगा, तुळशी वृंदावन, गोठ्यात गाई, म्हशी, घरात मांजर, अंगणात कुत्रे...

माझे आजोबा वांयगणे (उन्हाळी भात) करीत असत. लोबींत दाणा भरल्यावर पांढरपाठी मुनियांचा थवा त्याच्यावर ताव मारायला यायचा, त्यांना आवाज करून, दगड मारून, उडवून लावावे लागे. आवाजासाठी रिकामे डबे वाजवणे, दगड मारणे, आरडा ओरडा करणे ही माझी आवडती कामे.

मुनियांचा थवा उडून जाताना भुर्रर असा आवाज होई. त्यावरून नाव भुरली. पांढरपाठी मुनिया हे लांबलचक नाव यथावकाश कळले.

कोकणात पक्ष्यांना आवाजावरून नाव देण्याची स्थानिक पद्धत आहे. सायंकाळी धीर-गंभीर आवाजात ओरडणारे फिशींग आउल, कोकणात हुमण म्हणून परिचित. घराजवळच्या भेल्यावर ओरडताना ऐकले- पाहिले आहे. याचे डोळे वटारून पहिल्यासारखे वाटायचे. मान फिरवण्यावरून गंमत, पण त्याच वेळी भीतीही वाटत असे.

एक लहान घुबड (भारतीय शिगळा) हे आजारी माणूस दु:खाने कुंथतो त्यासारखा आवाज काढते म्हणून हे 'कुथ्यापाखरू', याला अशुभ समजले जाते. ओरडताना क्रक-क्रक असा काहीसा कर्कश आवाज येतो म्हणून मलबारी धनेश पक्ष्याला 'ककणेर' नावाने ओळखतात.

पक्ष्यांना आवाजावरून स्थानिक नाव देणे या पद्धती बरोबर काही गंमतीदार दंतकथाही सांगितल्या जातात.

कवडा ओरडतो, कवडा पोर, सीतेचे पोहे गोड गोड.... एक जण त्याची बहीण आणि पत्नीसह रहात होता. कोकणातील प्रथेप्रमाणे त्यांनी भाताचे पोहे केले. बहिणीचे पोहे कमी झाले, कारण तिने धान पाखडून साफ करून ठेवले होते. बायकोने साफ न करता, न पाखडता तसेच ठेवले. त्यामुळे दिसायला जास्त वाटत होते. बहिणीचे पोहे कमी झाले या रागाने बहीण सीता हिला त्याने घरातून घालवून दिले. नंतर बायकोने केलेले पोहे खाताना त्यातील टरफले न काढल्याने घशाला लागली. बहिणीचे पोहे साफ करून ठेवले असल्याने छान गोड लागले. यावरून त्याला बहिणीला घराबाहेर काढल्याची अपराधी भावना मनात आली. त्यातच त्याचा मृत्यू झाला. अपराधी भावना ठेवून मृत्यू आला तर दुसरा कोणताही जन्म घ्यावा लागतो; पण अपराधी भावना जात नाही. हा दुसऱ्या जन्मात कवडा झाला व ओरडू लागला... कवडा पोर पोर, सीतेचे पोहे गोड, गोड, अशा दंतकथा आजी किंवा मावशीकडूनच ऐकाव्या. दंतकथा खरी की खोटी कोण जाणे, पण 'सीतेचे पोहे' या

नावाचे सात–आठ इंच व झुपक्याने वाढणारे एक तण कोकणात उगवते व त्याला पोह्यांच्या आकाराचे बी येते हे मात्र नक्की खरे आहे.

कोकणचे निसर्ग कवी माधव केशव काटदरे यांचे गाव शिर. त्यांनी त्यांची प्रसिद्ध कविता हिरवे तळ कोकणमध्ये या प्रसंगाचे छान वर्णन केले आहे.

रुसवे, फुगवे, मनधरणी करणे हे फक्त माणसाचेच पेटंट हक्क नाहीत तर पशुपक्षी, झाडेसुद्धा यातून सुटली नाहीत. त्यांचे सदाबहार वर्णन कवी माधव यांनी केले आहे.

१. हे अळवीवरचे अळू, पिकूनिया लागले गळू, ही नयेच संधी टळू

म्हणून लाल तुऱ्याचा सरडा सखीला शील घाली हळूहळू

२. कुठे मंडलाकार नर्तन आरंभून रुसल्या सखीची घुमत पारवा करतो समजावणी ।।

अळू हा कोकणात वाढणारा सदाबहार छोटा वृक्ष आहे. त्याला लिंबाएवढ्या आकाराची फळे येतात. झाडाला फार टोकदार काटे असतात. काटा टोचला तर चक्क ताप येतो. अळू हे कोकणाच्या रान मेव्यातील एक फळ आहे. याला फोडून वाळविता येते (ड्रायफ्रुट सारखं). त्याला अळूची 'उसरी' म्हणतात. ही फळे पाऊस पडण्याच्या सुमारास तयार होतात. हयाच वेळी नर सरड्यााला गडद रंगाचा तुरा येतो. सरड्याच्या लहान जातीत नरांच्या मानेवरचा भाग लाल होतो. सरडयाचा बदलता रंगही पाउस येण्याची पूर्वसूचना समजली जाते.

असे अनेक प्रसंग कवी माधव यांनी आपल्या रसाळ कवितेतून चितारलेले आहेत. ते मुळातून वाचण्यासारखे आहेत. कवी माधवांची काव्यसंपदा काही प्रमाणात नेटवर उपलब्ध आहे.लहानपणी शिर येथे घालविलेल्या सुटयांमध्ये आकलन होवून मनात घट्टपणे विसावलेली निसर्गाची जाण अजूनपर्यंत उपयोगी पडत आहे.

सन १९५९ ते १९८९ ही तीस वर्षेभारतीय सेनेच्या तांत्रिक विभागात (ए.एम.ई) सेवा केली. भारतीय सेना जी काही शस्त्रे, आयुधे, वाहने किंवा इतर कोणतेही सामान वापरते ते सर्व सेवेत कार्यतत्पर ठेवणे, हे या विभागाचे काम. त्यासाठी लागणारे सर्व कौशल्य सेवेत आल्यावर शिकवणेसाठी ई.एम.ई.च्या अद्ययावत शिक्षण संस्था आहेत. मी सन ६८ ते ७० या दरम्यान electronic Engineering मध्ये डिप्लोमा EME महाविद्यालय, सिकंदराबाद येथे केला.

या तीस वर्षांत भारताच्या अनेक भागात सेवा करताना तेथील वनस्पती, प्राणी, पक्षी जीवन जवळून पहाता आले. यातील काही अजूनही आठवणीतले प्रसंग त्यावेळी विशिष्ट जात (स्पेसीज) वगैरे विषय माहीत असण्याचे कारण नव्हते. पण काही ठळक आठवणी अजूनही आठवतात.

सन १९६०/६१ मध्ये रविवारी निवांतपणा असायचा त्यावेळी ब्रेकफास्टमधील पुरीचे तुकडे उंच आकाशात उडवायचे व आकाशात घिरटया घालणाऱ्या घारी ते तुकडे वरचे वर पकडायच्या हे उद्योग चालायचे. त्यावेळी माझ्या दृष्टीने त्या सर्वच घारी होत्या. त्यावेळी वड, पिंपळ, शेवरी, कडुनिंब, जांभूळ, इत्यादी झाडे कॅम्पसच्या आजूबाजूला मुबलक होती. त्यावर अनेक पक्षी असत. तेथे बिनकाट्याच्या पांढऱ्या रंगाची फुले येणारी पांगेऱ्याची झाडे होती.

सन १९७१ च्या लढाईत जोधपूर मुक्कामी होतो. ३ डिसेंबर १९७१ च्या रात्री झालेल्या बॉम्ब हल्ल्यात जगणे आणि मरणे यातही रेषा किती अंधुक आहे याचा प्रत्यय आला. त्यावेळी सैनिकांच्या तुकडया अनेक ठिकाणी

पसरलेल्या होत्या. जागेवर दुरुस्तीकरिता जावे लागे. गाडीतून जाताना मोर, तीतर पक्षी तसेच नीलगाई, काळवीट हे प्राणीही आढळत. राजस्थानात पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्यामुळे पाण्याचा वापर सांभाळून होता. अनेक ठिकाणी लहान तळी आढळत. त्यामध्ये बदके तसेच इतर पाणपक्षी दिसत असत. खजुरीच्या (शिंदीचा प्रकार) झाडावर मैना (साळुंकी) आढळे. आपल्याकडील साळुंखीहून थोडी निराळी असावी. बहुधा गावाचे नाव व सरोवराचे नाव एकच असायचे.

सन १९७५ ते ७८ आग्रा येथे सेवे निमित्त ३ वर्षेहोतो. त्यावेळी ३ वेळा पक्षी पंढरी भरतपूरला भेट देण्याचा योग आला. लहान घरातून निवास न्याहरीची सोय होई. सायकल, रिक्षावाले गाईडकाम व ट्रान्सपोर्ट दोन्ही कामे करत. या पक्षी अभयारण्यात तीनशेहून अधिक पक्ष्यांची नोंद झाली आहे. येथे गेल्यावर काय पाहू आणि काय नको होते. पाणपक्ष्यांचे स्थानिक व पाहुणे येणारे पक्षी मोठ्या संख्येने भरतपूरला येतात. यात अनेक प्रकारची बदके, अनेक प्रकारचे सारस, राजहंस पहायला मिळतात. बोटिंगची सोय असल्याने पक्ष्यांच्या थव्यांबरोबर आपणही तरंगतो आहोत, असा भास होतो. थोडक्यात जीव तृप्त होतो. बदके तरंगता तरंगता मधेच खाली डोके करून भक्ष्य पकडतात, त्यावेळी पक्षी शीर्षासन करतो आहे असे वाटते. यात एका बदकाचे स्थानिक नाव 'सुरखब.' हे पाहुणे बदक Ruddy shelduck होय. स्थानिक वाङ्मयात हे सुंदरपणाचे परिमाण म्हणून ओळखले जाते. हे बदक सुंदर आहेच पण एकाहून सरस बदके आणि राजहंस पहायला भरतपूरला जायला हवे. त्याचे वर्णन मी पामर काय करणार?

आता घरातून बाहेरही न पडता सर्व ठिकाणी जाण्याची, पहाणेची सोय मोबाईल आणि इंटरनेटने झाली असल्यामुळे आयुष्य तसे म्हटले तर सुखकारक झाले आहे हे निश्चितच.

परंतु, सच्चाई छूप नहीं सकती झुटे असुलोंसे।

खुशबू आ नहीं सकती कागज की फुलोंसे ।।

हे पण तितकेच कटूसत्य आहे. टीव्हीवर किंवा नेटवर बघून तो वास, तिथली वाऱ्याची झुळूक अनुभवता येत नाही.

आग्रा व जवळच्या भागात हिवाळी पाहुणे पक्षी खूप येतात. अचानक कधीतरी एखादा छोटा काळा ढग पुढे सरकत जावा तसा पाहुण्या पक्ष्यांचा मोठा थवा आकाशातून मार्गक्रमण करताना आढळे.

माझ्या नदी किनारी लावलेल्या कलमांची जोपासना करणेसाठी दिवसाचा बराच वेळ शेतावर जाई व दोन तीन वेळा घर ते नदी किनारा हे १० मिनिटांचे अंतर असल्याने अनेक पक्षी पहायला मिळत. त्यात कावळ्या सारखा एक पक्षी उडण्यापेक्षा धावणे जास्त पसंत करतो आहे असे लक्षात आले. त्याला पळताना पहाताना मुंगसाची आठवण आली. सलीम अलीच्या पुस्तकावर भरपूर होमवर्क करताना हा 'सिरकीर ककू' असल्याचे समजले.

ज्यावेळी पुस्तक मिळाले नव्हते त्यावेळी कुठल्याही नवीन पक्ष्याची तुलना प्रथम ओळखीच्या पक्ष्याशी करत असे. ज्याच्या डोक्यावर तुरा आहे तो बुलबुल. माझ्या बुलबुल यादीत लांब शेपटीचा पांढरा बुलबुल, भगवा बुलबुल, राजा बुलबुल इत्यादी बुलबुल होते. पुस्तक मिळाल्यावर पांढरा लांब शेपटीचा म्हणजे स्वर्गीय नर्तक, त्याची मादी म्हणजे भगवा बुलबुल, राजा बुलबुल म्हणजे चातक असल्याचे उलगडले. माझ्या पक्षी निरीक्षणाला

शास्त्रीय अँगल नव्हताच– आजही नाही. मी माझी करमणूक व त्या विश्वनियंत्याच्या करामतीची तारीफ करतो. कदाचित त्यानेही सर्व त्याच्या करमणुकीसाठीच बनविले असावे. माझी आंबा कलमे वाढत होती त्याबरोबरच इतर अनेक गोष्टी उलगडत होत्या. एखादी अडचण धोका दिसला तर साहाजिकच आपण शेजाऱ्याला हाक मारतो अशा वेळची हाक आणि इतर वेळी मारलेल्या हाकेमध्ये फरक असतो, तसा पक्ष्यांच्या प्रत्येक वेळेच्या आवाजात फरक जाणवतो. माझ्या बागेत पावसाळ्यात कस्तुर, काळू, सुगरण इत्यादींची घरटी असायची. एका दुपारी जोरजोरात पक्षी ओरडत असल्याचे ऐकले म्हणून पाहिलं तर एक धामण कस्तूरच्या घरटयाकडे निघाली होती. मी जवळ गेल्यावर त्या दिवशी धामण तेथून गेली. पण दोन दिवसानी घरटे रिकामे झाले होते.

पक्षी घरटी बांधताना सर्व काळजी घेतातच त्यामुळे सर्व सामान्य पावसात, वाऱ्यात घरटे उसकटत नाही. तरीपण कधी कधी गडबड होतेच. आमचा खंदा कार्यकर्ता सचिन पालकर घरटयांच्या शोधात सर्वत्र फिरत असायचा. एक दिवस सायंकाळी सचिन सांगत आला, एका पिलकचे घरटे एका बाजूने पडायला झाले आहे. झाड असाण्याचे उंच होते. बनीयनचे जुने कापड, सुई दोरा, शिडी घेऊन गेलो. एक शिडी पुरेना घरून दुसरी शिडी आणली. आमची लगबग बघून गावातील तरूण मदतीला आले. शिडीला शिडी बांधून प्रयत्नाने उभी करून सचिनने वर चढून बनीयनचा आधार दिला. आमची ढवळाढवळ पिलकाला पसंत पडते का याची शाश्वती नव्हती. पुढील काही दिवस नजर ठेवून होतो. सुदैवाने पिले मोठी होऊन उडून गेली.

पुण्याचे डॉ. सतीश पांडे चिपळूणला त्यांच्या नातेवाईकांकडे येत असत. त्याच परिसरात राम मोने दुर्बीण कॅमेरा घेऊन फिरता मोने व पांडे याची ओळख झाली. या ओळखीचे मैत्रीत परिवर्तन होवून पुढे अनेक कार्यक्रमात पांडे आमच्या बरोबर होते. डॉ.पांडे यांचे त्यांनी स्वतः काढलेल्या पक्षी छायाचित्रांचे प्रदर्शन चिपळूणला शाळेत लावले होते. अनेक नागरिकांनी त्याचा लाभ घेतला. आपल्या शंका विचारल्या. डॉ. पांडेंना पिंपळीला आमच्या ग्रामदेवालयात असलेला पाकोळीचे घरटे दाखवायला गेलो होतो. त्यांनी सुरेख फोटो काढले व दैनिक सकाळ मध्ये लेख लिहिला होता. ही पाकोळी 'लालबुडी भिंगरी.' हिचे घर म्हणजे छताला चिकटवलेले अर्धचंचुपात्र. हे घरटे बनविणेसाठी खास माती लागते जी नदी किनारी फारशी वर्दळ नसलेल्या ठिकाणाहून ही पाकोळी आणते. या पाकोळीचे संस्कृत नाव आहे देवकुलचटक. मी एका ठिकाणी तीन घरटी एकमेकांना चिकटून केलेली पाहिली आहेत. विशेष म्हणजे ती तीनही घरटी चालू होती. ही पाकोळी सिव्हील इंजिनिअरींग कुठे करते कोण जाणे? हिचे संस्कृत नाव देवकुलचटक देवळात घरटे बांधणारा रंगीत पक्षी अशा अर्थी आहे. कानडे कुटुंबियाच्या खाजगी देवळामध्ये हिचे घरटे अनेक वर्षेआहे.


(क्रमशः)


डॉ. गजानन वाघ

सु. मेजर (निवृत्त) जयंत कानडे
E mail : jgkanade@gmail.com
९१९७६५१५५६०



# पळस फुलला



श्री. माणिक पुरी

पळसाची तांबडी नारंगी फलं वसंतोत्सवाची शोभा वाढवितात. गंधहीन फुलंसुद्धा हवीहवीशी वाटतात. तांबडं फट लागताच ही तांबडी फुलं गोजिरवाण्या पाखरांवर रंगांची उधळण करून पाखरांसमवेत झाडही अधिक खुलून दिसतं. दुर्लक्षित असणारं झाड सगळ्यांच्या मनावर गोंदलं जातं. रानातला पळस पशुपक्ष्यांच्या मनात बाग फुलवितो. माळरानावर फुललेला पळस पाहून उन्हाची दाहकता वाऱ्यावर विरून जाते.

झाडाच्या शेंड्यावरची पानं गळून पडतात तेव्हा कळ्या फांदीवर दाटीवाटीनं एकत्र उमलू पाहतात. त्यांचा मेहंदी रंग नवरीच्या हातावर उतरू पाहतो.

कळीचा देठ पंचभागात विभागला जातो. नारळाच्या खोडातील घरट्यातून पोपटाने चोच बाहेर काढावी तशी कळी देठातून बाहेर डोकावून पाहते. पांढरट पिवळसर दिसणारी कळी तांबडी होत जाते. फुलातील आतील भाग अधिक गडद होत जातो.एक पाकळी पूर्णपणे बाहेरील बाजूस झुकते अन् त्यावर दोन पाकळ्यांचा भार पडतो. टोकाच्या दोन पाकळ्या एकजीव असतात. काही दिवसांनी त्या वेगळ्या होतात. कळी उमलते. पाखरांना खुणावित असते.

उत्तर आशिया युरोपमधन पळसमैना फुलातील मकरंद चाखायला येतात. पळसाचं आणि या पाखरांचं अतूट नातं असतं. त्या दिवसभर चक्-चक् आवाज करत झाडाभोवती रेंगाळतात.

पळसमैना साळुंकीच्या आकाराएवढ्या. दोन्ही पंख आणि शेपटी काळ्या रंगानं चितारलेली. डोके, गळा आणि छाती काळ्या रंगात बुडवून काढलेली. पोटाचा पांढरट बदामी रंगसुद्धा आकर्षक दिसतो. या पाखराला भोरडी म्हणूनही ओळखले जाते.

ज्वारीच्या पिकांवरही त्या हमखास उतरतात. सायंकाळच्या वेळी आकाशातील त्याच्या कसरती फारच सुंदर दिसतात.

परभणीजवळील इंद्रायणी माळावर पळसाची झाडे मोठ्या प्रमाणात आहेत. त्यावर उतरलेल्या पळसमैना आनंद देतातच, त्यांच्या सहवासामुळे मनावरची मरगळ झडून जाते.

बुलबुल, सूर्यपक्षी, भारद्वाज, भांगपाडी मैना, सुतार, साळुंकी, चिमण्या, सुगरण, गोमेद, सातभाई या पक्ष्यांनी पळसाची झाडं गजबजून जातात. दिवसभर या झाडावर पक्ष्यांचा मेळावाच भरतो.

झाडाजवळ गेल्यावर त्याच्या संदरतेत आणखी भर पडलेली दिसते. मधमाशांची गुणगुण कानाला बोलावते. त्या फुलातील मकरंद चाखत असत. पाखरांपेक्षा मधमाशांची संख्या लक्षणीय असते. तेथील संगीत वातावरणात मिसळते. मधमाशांच्या पंखांचा आवाज तांबड्या फुलावर भिरभिरत राहतो. ते झाड झाड न उरते. दिवस भरत जातात तसा तांबडा पळस हळूहळू पिवळा होत जातो. बाहेरील बाजूला झकलेल्या पाकळीच्या

दिशेने फुलातून पापडी डोकावते. पिवळ्या पाकळ्या काही दिवसांनी गळून पडतात. तांबड्यातून पिवळा आणि पिवळ्यातून हिरवा रंग पाझरत खाली ओघळतो. झाडावरच्या पापड्या झुंबर होऊन वाऱ्यासोबत खेळतात. हिरव्या पांढरट पापड्या मेहंदी रंगाची टोपी घालून जमिनीला न्याहाळतात. पिवळसर देठ त्यांना मुळाशी एकजीव करतो. भूगर्भातील सौंदर्य पानाफुलांतून खुलतं.

एप्रिल–मे महिन्यात पापड्या रंग बदलतात. वयस्कर दिसतात. हळूहळू वाळायला लागतात. वाऱ्याच्या झुळकीसोबत छनछन आवाज करत त्या वाटसरूला भुरळ पाडतात. एखाद्या वावटळीसोबत रानभर पांगतात. पापड्या झाडावरून उतरण्यापूर्वी झाडाला पालवी फटत जाते. हिरवी. पोपटी, तांबूस पाने अंगअंगाला बिलगतात. ही पानं झाडाला वस्त्र पुरवत जातात. जसं गवत जमिनीला वस्त्र पुरवतं.

हाल सातवाहनाची गाथासप्तशती या ग्रंथात मुंगुस नावाची गाथा पळसाच्या कोवळ्या पानांचं वर्णन करते. शिशिर ऋतुतल्या वणव्यात जळून गेलेल्या पळसाच्या फांद्यांवर आता वसंतात पुन्हा कोवळी पालवी फुटली आहे. ही पाने मुंगसाच्या कानांसारखी दिसत आहेत.

पळस फुलण्यापूर्वी झाडाची पानं गांगरुन गेलेल्या माणसासारखी भासतात. पानांचा खडबडीतपणा नकोसा वाटतो. ही पानं पाचोळा होऊन वाऱ्यावर उडून जातात. तेव्हा कळ्यातून पोपटाच्या चोची डोकावतात. हिरव्यागार पापड्यांचा आवाज वाऱ्यावर विरून जातो तसा पाखरांचा लळा कमी–कमी होतो.

मुंगसाच्या कानासारखी दिसणारी तांबूस पानं पोपटाचा रंग अंगावर ओतून घेतात. त्या प्राण्याच्या कानाची रचना आणि पळसाची कोवळी पानं सारखीच दिसतात. उगवती पानं मुलायम अन् आकर्षक दिसतात. पानांच्या पाठीमागील बाजू नक्षीकामानं चितारलेली. प्रत्येक देठाला तीन पानं. म्हणून पळसाला पानं तीन ही म्हण प्रचलित असावी.

मध्यभागी असलेले मुख्य पान. त्याच्या वरच्या बाजूला उजव्या हाताचं आणि डाव्या हाताचं पान असतं. त्यावरून उजवीडावी पत्रावळी बनविता येते. या पानावरचं जेवण रुचकर लागतं अशी सगळ्यांची भावना असते. कडुलिंबाच्या काड्यांनी पानं टाचली जातात. सारख्या आकाराची पानं निवडली की पत्रावळीचा आकारही सारखाच होतो. पत्रावळीचा गठ्ठा बनविला की पानं वाळली तरी हिरव्या रंगाचीच दिसतात. त्या पानावर पाणी शिंपडले की पानं टवटवीत दिसू लागतात. त्यावर अन्न चिटकतही नाही.

दोन मुख्य पानांपासून द्रोण बनवले जाते. रानात बिनगीतलं पाणी पिण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. पत्रावळीवर हे द्रोण पातळ भाजीसाठी वापरले जातात.

पळसाची पानं कुणी खात नाही. परंतु तांबडी फुलं हरिण कुळातील प्राणी खातात. वाळलेल्या फुलांपासून रंगपंचमीसाठी पिवळाजर्द रंग घरोघर तयार करून रंगोत्सव साजरा केला जातो.

झडीपाण्याच्या दिवसात उभारलेल्या झोपड्यांवर पळसाच्या डहाळ्या अंथरल्या जातात. पोळ्याच्या सणाला पळस भिजवायला पाऊस येतो. धार्मिक विधी करताना पळसाच्या समिधा वाहतात. भंडाऱ्याचा प्रसाद पळसाच्या पानावर दिला जायचा. तिळाच्या पापड्या पळसाच्या पानावर घातल्या जायच्या. वधू सासरी

जाताना पळसाची सोबत असायची.पण आज सारं काही हरवत चाललं.

मार्च महिन्यात सोनपाठीसुतार पक्ष्यांच्या नोंदी घेत होतो. नर पिलांना अळ्या, कीटक भरवायचा. नराचा पाठलाग केला. तो पळसाच्या पानाआड लपून भक्ष्य टिपायचा. कमी वेळात या झाडावरील कीटक घेऊन जायचा. मादी हिरव्या अळ्या कुठून आणायची ते कळले नाही. थोड्या अंतरावर ज्वारीची शेती होती. त्यावर टोई पोपट उतरायचे. मला वाटत असे की, सुतार (मादी) या शेतातून अळ्या घेऊन जात असावी. पण तसे घडले नाही. पळस फुलण्याच्या दिवसात सोनपाठी सुतार, तांबट आणि धनेश अशा पक्ष्यांची वीण असते. पिंपळ कुळातील वृक्ष फळांनी लदबदून जातात. तिथं या पाखरांना पाहता येतं..

मधमाशा फुलातील रस शोषतात. काही आदिवासी त्यांचा पाठलाग करून मधाचे पोळे शोधून काढतात.पळसमाया सगळ्यांवर असते.

पळसाचं खोड अनाकर्षक राखाडी रंगाचं. कवेत न मावणारी पळसाची खोडं त्यांच्या अस्तित्वाची साक्ष पुरवितात. जमिनीला घट्ट धरून वाऱ्यावावधानाला भक्कमपणे सामोरं जातात. बुंध्यापासून फांद्यापर्यंत काही कीटकांची रांग दिसते. त्यावर खसखशीसारखे दाणे खोडावर आढळतात. संयुक्त कुटुंबातील प्रमुखासारखं झाड सगळ्यांचा भार खांद्यावर वाहतं.

जशी अंगणातली तुळस तसा रानातला पळस सगळ्यांच्या आवडीचा. पळसावरील पाखरांची किलबिल घरातील लेकरांसारखी हवीहवीशी वाटणारी.सासरी जाणारी मुलगी गावखरीच्या पळसाकडं तोंड फिरवते. झाडाखालची फुलं टोपलीत घालून घरी आणल्याचं तिला आठवत तर नसेल? मैत्रिणीसोबत पिवळ्या रंगात रंगून गेलेली बालपणीची सखी आज हळदीच्या अंगाने सासरी जाताना गावाला आसवं टिपायला लावते.

धुऱ्या काडीकचरा जाळताना पळसाची पानं भूरभूर जळत राहतात. काही पानं पाऊस पडल्यावर मातीशी एकरूप होतात. उद्याच्या सुंदर दिवसासाठी.सगळ्यांचं मन मुंगसाच्या कानासारखं दिसणारं अन् पळसाच्या पानासारखं मुलायम असणारं असावं म्हणजे त्याच्याही मनात पळस फुलत राहील. दरवर्षी पळस फुलतो. रात्रीच्या वेळी किती शांत वाटतो. निरागस बालकासारखा झोपलेला..






माणिक पुरी
पक्षी अभ्यासक, परभणी
९८८१९६७३४६

# सतत उडतच राहणारे पक्षी



श्री. राजकमल जोब

डेव्हिड लॅबर्ट लॅक १९१०-१९७३ या ब्रिटिश जीव उत्क्रांती शास्त्रज्ञाला आणि त्याच्यासोबत काम करणा-या शास्त्रज्ञांना पाकोळी (swift) या पक्ष्याचा अभ्यास करताना संध्याकाळी हे पक्षी वर आकाशात उडत जाताना दिसले पण हे पक्षी सकाळपर्यंत परत आले नाहीत यावरुन हे पक्षी आकाशात सतत उडतच असावेत, असा अंदाज त्यांनी काढला. कारण प्रथम महायुद्धाच्या काळात एका फ्रेंच वैमानिकाने त्याला रात्री विमान उडवत असताना आलेला अनुभव त्याने नमूद करून ठेवला होता. तो म्हणतो, 'आम्ही आमचे विमान १० हजार फुटावरून उडवत असताना अचानक आमच्या विमानाच्या खाली एक पक्ष्यांचा थवा आम्हाला दिसला. ते सर्व पक्षी संथ गतीने उडत होते. यापैकी दोन पक्ष्यांना पकडले गेले आणि नंतर ते पक्षी पाकोळी जातीचे असल्याचे सिद्ध झाले.'

डेव्हिड लॅक आणि त्या फ्रेंच वैमानिकाने ते पक्षी उडताना झोपले होते का? हे पाहिले नाही.पण आत्ता पक्षाच्या स्थलांतरावर सखोल संशोधन झाल्यामुळे पाकोळी, फ्रिगेट बर्डसारखे पक्षी सतत दहा महिने उडत असतात हे सिद्ध झाले. या काळात ते अन्न खातात, झोपतात, प्रणयाराधन करतात इतकेच काय त्यांचे मीलनही हवेतच होते.

स्थलांतर करणारे काही पाकोळी, तुतवारसारखे पक्षी जे सूदूर उत्तरेकडून थेट आफ्रिकेच्या दक्षिण टोकापर्यंत प्रवास करतात ते मध्येच झोप घेत असावेत असा अंदाज फार पूर्वीपासून शात्रज्ञांनी केला होता.

पक्षी एक डोळा उघडा ठेवून झोपू शकतात हे तेराव्या शतकातच माहीत झलेले होते. जिओफ्रे चौसर आपल्या प्रसिद्ध कँटरबरी टेल्स १८३६ मध्ये म्हणतो 'smale fowles....slepen (sleep) at night with open ye... आज आपल्याला हे माहीत झाले आहे की, एक डोळा उघडा ठेवून झोपणे हे समुद्री प्राण्याचे वैशिष्ट्य काही पक्ष्यांमध्येसुद्धा आलेले आहे. पाणबदके अशा प्रकारे डोके पंखाखाली घालून झोपलेली आपण नेहमी हिवाळी पाणपक्षी गणणेच्या वेळी अनुभवलेले आहे.

पक्षाचा मेंदू मानवाच्या मेंदूप्रमाणे डावा आणि उजवा अशा दोन सेलेब्रल गोलार्धात विभागलेला असतो. म्हणजेच जेव्हा पक्षी डावा डोळा उघडा ठेवून झोपला असेल तर त्याचा उजवा मेंदू कार्यरत असतो व उजवा डोळा उघडा असेल तर मेंदूचा डावा गोलार्ध कार्यरत असतो. मानवाचा मेंदू अशा दोन गोलार्धात विभागलेला आहे आणि त्याच्याद्वारे वेगवेगळे कार्य होते हे १८६० साली पिरी ब्रोका या फ्रेंच शरीरशास्त्रज्ञाने शोधून काढले. पक्ष्यांचा मेंदूही अशाच प्रकारची माहिती देतो हे एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी शोधले गेले. हे लक्षात

आल्यावर पक्षी एक डोळा उघडा ठेवून मेंदूच्या अर्ध्या भागाला विश्रांती देऊ शकतात हे समजले. माणसाला कुठे जमते हे ?

पण पक्षी उडताना झोप घेतात हे माहीत होण्यासाठी २००० साल उजाडावे लागले. शात्रज्ञांना पक्ष्याचा मेंदू दोन गोलार्धात विभागलेला असल्यामुळे ते मेंदूच्या अर्ध्या भागाला विश्रांती देवू शकतात हे माहीत झाल्यावर त्याची सत्यता पडताळून पाहण्यासाठी निल्स रोटेनबर्ग या मॅक्स इन्स्टिट्यूटच्या शास्त्रज्ञाने व त्याच्या सोबत्यांनी उडत असताना पक्ष्यांच्या मेंदूचे कार्य रेकॉर्ड करण्याचे ठरविले. त्यासाठी झूरीच येथील स्विस फेडरल संस्थेच्या मदतीने एक लहान उपकरण बनविले जे पक्ष्याच्या डोक्याला लावून त्याच्या मेंदूत होणाऱ्या या बदलाची नोंद घेतली. सर्व प्रथम हे उपकरण गॅलापॅगोस येथील फ्रिगेट बर्ड या पक्ष्याच्या डोक्याला लावले. हे पक्षी घरट्यातून उडाल्यावर ३००० किलोमीटरपर्यंत न थांबता सतत उडत होते. जेव्हा त्यांच्या डोक्याला लावलेल्या उपकरणातील माहिती तपासली तेव्हा असे लक्षात आले की, हे पक्षी दिवसा जागे असत. पण रात्री ते 'संथ झोपेच्या तरंगात' जात असत. यावेळी त्यांचा एक डोळा उघडा असल्यामुळे ते दिशा चुकत नव्हते. अशा रीतीने ते पक्षी आपल्या मेंदूच्या दोन्ही बाजूंना विश्रांती देऊ शकत होते. पण हे पक्षी उडताना दिवसा फक्त ४२ मिनिटेच झोप घेत होते. हेच पक्षी जमिनीवर असताना दिवसाचे १२ तास झोपत होते.

अलीकडेच ऍंडर्स हेंडस्ट्रॉम आणि त्याच्या सोबतच्या शास्त्रज्ञांनी 'पॅलिड स्विफ्ट' या जातीच्या चार पक्ष्यांचा रेडिओ मॅपिंग उपकरण लाऊन अभ्यास केला. तेव्हा असे लक्षात आले की, हे पक्षी दोन ते तीन महिने सतत उडत होते. त्यांच्या विणीच्या काळातच ते जमिनीवर उतरले. २००४ मध्ये स्वीडनच्या एका शास्त्रज्ञाने २२५ पाकोळी पक्ष्यांना ट्रान्समीटर लावून त्यांचा उडण्याचा वेग, त्यांची दिशा, झोप घेण्याची वेळ याची अचूक नोंद केली. हे पक्षी दहा हजार फूटांवरून उडताना झोप घेत होते. भक्ष्य खात होते आणि आपला उडण्याचा मार्ग कायम ठेवीत होते. अलीकडेच 'फेलीक्स लिची' या शात्रज्ञाने सहा पाकोळी पक्ष्याच्या हिवाळ्यातील स्थलांतराची नोंद घेतली हे पक्षी चार महिने स्वीडनपासून सहाय वाळवंटापर्यंत सतत चार महिने उडत होते.

पक्षी त्यांची जीवन पद्धती, त्यांचे हवेतील उडणे, त्यांचे स्थलांतर, विणीच्या काळातील त्याची वागणूक हे अजूनही मानवासाठी कोडेच आहे. यावर अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.

राजकमल जोब
भंडारा

# धाविक : एक निरीक्षण



शिवानंद हिरेमठ




निसर्गात आपला वंश वाढविणे प्रत्येक सजीवांचा स्थायी गुणधर्म असल्याने त्यांची वंशावळ वाढविण्यासाठी ते सर्वतोपरी कष्ट करण्यास तयार असतात. असल्याही विषम परिस्थितीला दोन हात करण्यासाठी ते त्यांच्या विशिष्ट अधिवासात तयार झालेले असतात. आपल्याला अनेकदा त्यांच्या क्षमतेचा परिचय करून देत असतात. सदर लेखामध्ये पक्षिनिरीक्षकांनी नोंदविलेल्या  माळरानावरच्या एका घटनेचा आढावा घेऊ. धाविक पक्षी प्रजातीच्या जीवनातील जगण्यासाठीच्या संघर्षाचे उदाहरण पाहूया.

घटनाक्रम

वसंत ऋतूमधली एक दुपार, दक्षिण महाराष्ट्रातील खुरट्या झाडांची जंगले वाळून गेली, दूरदूर अंतरावर विखुरलेल्या झाडांची पानगळ झालेली, तापमान ३५ अंश सेलसीअसच्या पुढे गेले होते. गवतपाती वाळून माळरानं अगदी कोरडी ओसाड दिसत होती. अशा परिस्थितीत जीवन जगणे म्हणजे एक कसोटीच. पक्षिनिरीक्षणासाठी नेहमीच्या ठिकाणी म्हणजे दक्षिण सोलापूरमध्ये गेलो होतो. धाविक वावरण्याची ठरलेली जागा. परंतु आज आम्हाला विचलित करणारी विशेष हालचाल रानावर घडत होती. दोन धाविक समोर होते. साधारण ५० फूट अंतरावरून आम्ही निरीक्षण करत होतो. एक पक्षी जमिनीवर बसला होता आणि दुसरा सुमारे दहा फुटाच्या परिघामध्ये हिंडत होता.

आठ–दहा मिनिटांच्या अंतरामध्ये पहिला पक्षी त्याच्या बसण्याची दिशा बदलत होता. सुरुवातीला तो पूर्व–पश्चिम बसला, नंतर तो थोडावेळ दक्षिणोत्तर बसला, आणि आता तो नेमका माझ्यासमोर वायव्य–नैऋत्येला होता, अर्थात मीसुद्धा. सततची कूस बदलणे हे काही सामान्य वर्तन नसल्याची प्रचीती देत होती. कोरडी माती

आणि वाळलेल्या गवतामध्ये भूमीवर समांतर झोपून पाहत असल्यामुळे नेमकी चित्र समजणे कठीण होते. मात्र दोन–तीन छायाचित्रे घेऊन पाहिले आणि सत्य समोर आले. जमिनीशी मिळतीजुळती रंगसंगती असलेली दोन अंडी उबविण्याचे काम तो पक्षी करत होता. आम्ही आश्चर्याने पाहताच राहिलो. विशेष म्हणजे धविकाचे प्रजनन पाहायला मिळणे म्हणजे भाग्यच. मुख्यतः मार्च ते ऑगस्ट हा यांचा विणीचा हंगाम (सालीम अली, २०१८). इथून पुढे आम्हाला जे दिसणार होतं ते मात्र अलौकिकच होते. उत्सुकता शिगेस पोहोचली होती. उन्हाचा ताप हळूहळू उतरत होता. सायंकाळचे पाच वाजण्याचा सुमार आणि पहिला पक्षी अंड्यातून बाहेर पडला. ते खूप गोंडस होते. त्याच्या अंगापेक्षा त्याच्या चोचीवरचा तात्पुरता दात म्हणजेच अंडज दंत जास्त चमकत होता. त्याला ऊब देण्यासाठी आणि उन्हापासून वाचवण्यासाठी पालकाने आपल्या पंखाखाली घेतलं. समोर काय घडत आहे. याचं वास्तव आम्हाला समजले. दोन अंडी होते. त्यापैकी एकातून पहिले पिल्लू बाहेर पडले. पुन्हा त्या पालक पक्ष्यांची हालचाल वाढली. आता मात्र जमिनीवर सूक्ष्म हालचाल दिसू लागली. पालक पक्षी उभे राहिल्यावर समजले दुसरे पिल्लू अंड्यातून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात आहे. अंड्याचा अर्धा भाग तुटून पडला होता त्यातून पिल्लू आपले डोके बाहेर काढून डोलत होते. मात्र त्याचे पाय उर्वरित अंड्यात होते. लुडबुडत होते. त्याचे पालक आणि आम्ही जीवाची नजर करून त्याकडे पाहत होतो. अंड्याचं कवच पिल्लाच्या शरीरापासून अलग झाले आणि न सुकलेल्या पिसांसह, भिजलेल्या अंगाचे पिल्लू जमिनीवर आले. या वेळेपर्यंत पहिले पिल्लू लुडबुडत – लुडबुडत काही पावले चालत चालत गवत पात्यांच्या आडोशाला सरकू लागले. पालक पक्ष्याने अंड्याचे कवच आपल्या चोचीत धरून दहा–बारा फूट अंतरावर पश्चिम दिशेला घेऊन गेला. तिथे जाऊन चोचीनेच त्याचे तुकडे केले. परतल्यानंतर गवत पात्यांवर त्याची काहीतरी शोधाशोध सुरू झाली. दरम्यान तेथे शेणाची एक गवरी पडली होती. ती वाळली होती. त्याचे तुकडे झाले होते. जाडीने पातळ असल्यामुळे पक्षाने ती गवरी खरडून पलटवली. आणि इथून एक वेगळीच हालचाल स्थळावर घडून आली. दुसरे पिल्लू अजूनही कोरडे झाले नव्हते. त्याच्या एका फुटाच्या अंतरावर काळ्या मुंग्यांचे वारूळ होते. दुर्बिणीतून मुंग्या अस्पष्ट दिसतात मात्र त्या जेव्हा कॅमेरात पाहिलं तेव्हा दिसल्या. अचानक पिल्ल्याची हालचाल वाढली. ते चालत नव्हते तर एकदा डोक्यावर पडत होता, कोलमडत होता, दोन चार पावले लंगडत–लंगडत जायचं, कोसळायचं. पालक पक्षी त्याच्या पंखावर चोचेने डिवचत होते.

समोर नेमके काय घडत आहे हे कॅमेऱ्याने काही चित्रांत टिपले होते. ते पाहिल्यावर उमजले की छोट्या पिल्यावर मुंग्यांच्या एका मोठ्या गर्दीने हल्ला चढवला होता. पिल्लू तडफडू लागले. पालक मुंग्या दूर करण्याची पराकाष्टा करत होते. पहिले पिल्लू एका दिशेला आणि दुसरे पिल्लू एका बाजूला होते. तितक्यात तिथे एक माळटिटवीची जोडी आली. टिटवी हळूहळू धाविकाच्या जवळ येत होती. धाविकाची जोडी पिल्ल्यांवर आलेले संकट दूर करण्यासाठी पराकाष्टा करत होती. त्याच दरम्यान टिटवी कामात व्यत्यय आणत होती. परंतु धाविक जोडी डगमगली नाही. त्या दोघांनी मिळून टिटव्यांना पळवून लावले. या वेळेत मुंग्यांच्या सेनेने पिल्लांचा फडशा पाडला होता. एका पिल्ल्याचा मृत्यू झाला होता. दुसरे पिल्लू मात्र पाच–सहा फूट दूर गवतात दडपून बसले होते. आमच्या मनात शोककळा पसरली. निसर्गाच्या कटू नियमांमध्ये प्रत्येक सजीवाला कठोर संघर्षातून जावं लागतं आणि या अथांग रानावनात अस्तित्व सिद्ध करण्यासाठी अशा जीवघेण्या घटनांचा सामना करावा लागतो,

विश्लेषण

जन्म – मृत्यूचे हे थरारक नाट्य निसर्गात सतत घडतच असते. घटना आपल्या नजरेस पडणे फारच दुर्मीळ. खूप कमी निसर्ग अभ्यासकांनी अशा गोष्टी नोंदविल्या आहेत. २०१९ साली राहुल वंजारी आणि राघवेंद्र वंजारी यांनी अशी घटना नोंदविली आहे. सदर लेखही याला आधार देतो. या निरीक्षणामध्ये चार उपघटक नव्याने समजून घेण्यास मदत होत आहे जसे की,

१) पिल्लांच्या जन्मानंतर अंड्याचं कवच दूर नेऊन फोडणे. खुल्या रानावर वावरणाऱ्या इतर मांसाहारी शिकाऱ्यांना याचा गंध मिळू नये हा या मागचा उद्देश.

२) मुंग्या खाण्याच्या उद्देशाने धाविक पक्षाने वाळलेली गवरी पलटली. मुंग्यांच्या वस्तीला धोका पोहचला व नवजात पिल्ल्याच्या गंधाने मुंग्यांनी त्याचा चावा घेतला असावा.

३) माळटिटवीने धाविकाच्या वीण काळादरम्यान व्यत्यय आणणे. समान नैसर्गिक स्त्रोतांची गरज भागविण्यासाठी प्रतिस्पर्धी प्रजाती सोबत संघर्ष करणे हा निसर्ग नियम टिटवी पाळत असावी.

कुतूहल

१. रानात अन्न – पाण्याची कमतरता असताना धाविकने या काळात प्रजननाचा निर्णय का घेतला असावा?

२. धाविक २–३ अंडी देतो. मात्र पिल्लांच्या जगण्याची शाश्वती फार कमी असते तर, तीन पेक्षा जास्त अंडी दिल्याचे कुणी नोंदविले आहे काय?

३. मुंग्या ह्या खरंच जमिनीवर अंडी घालणाऱ्या पक्ष्यांच्या नैसर्गिक शिकारी आहेत का? का याला फक्त योगायोग समजावा?

४. मुंग्यांपासूनच्या बचावाची काही रणनीती किंवा पूर्वतयारी धाविक किंवा तत्सम पक्ष्यांकडे असते का?

५. माळटिटवीचे वर्तन अधिक स्पष्ट होणे गरजेचे आहे.

संदर्भ

सालिम अली (२०१८) भारतातील पक्षी. बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, पृ. तेरावी मराठी आवृत्ती. अनुवाद– अरुण जोशी. राहुल वंजारी आणि राघवेंद्र वंजारी (२०१९) माळावरचा कहर. पक्षीमित्र ९(४) पृ. ५.

तळटीपा : धाविक पक्षाची नर मादी सारखेच दिसतात. लेखनाच्या सुसूत्रतेसाठी एक पक्षी, दुसरा पक्षी, पहिला पालक आणि दुसरा पालक असे नमूद केले आहे. मुंगीची प्रजाती ओळखता आली नाही.




शिवानंद हिरेमठ
निलेश भंडारी आणि
राघवेंद्र वंजारी

# बुलबुल : पिल्लाचं संगोपन

सागर सुरवसे

माझ्या घरासमोर एक जांभळाचे झाड आहे. त्या झाडावर नेहमीच छोट्या-छोट्या पक्ष्यांची रेलचेल असते. एकदा एक पक्षी सारखा त्या झाडावर ये-जा करत होता. मी विचार केला की, कोणता पक्षी असावा हा? तो आकाराने चिमणीपेक्षा थोडासा मोठा दिसत होता. त्याचं सगळं तोंड काळंकाळं आणि पंख तपकिरी होते. विशेष म्हणजे त्याच्या 'बुडाला लाल ठिपका दिसत होता. सलीम अलींच्या पुस्तकांत शोधून पाहिलं तेव्हा कळालं की, हा तर 'बुलबुल' पक्षी आहे. शिवाय, ही प्रजाती लालबुड्या बुलबुल म्हणून ओळखली जाते. कारण त्याच्या बुडांशी असलेल्या लाल ठिबक्यावरुन त्याला हे नाव पडले आहे. बुलबुल या पक्ष्याचा समावेश 'पिक्नोनॉडीडी' या पक्षिकुळात होतो. इंग्रजीमध्ये आपण त्याला Red Vented Bulbul असे म्हणतो तर त्याचे शास्त्रीय नाव Pyconotuscafer असे आहे. हा पक्षी भारतासह श्रीलंका आणि ब्रह्मदेशातही आढळतो. माझ्या घरासमोरील जांभळीच्या झाडावर दोन फांदीच्या बेचक्यात गवताच्या काड्यांच्या साहाय्याने वाटीच्या आकाराचे त्याने गोल घरटे केले होते. माणसांचा वावर असूनही हा पक्षी अगदी बिनधास्तपणे त्या झाडावर राहत असे.

रोज तो पक्षी सकाळपासून संध्याकाळपर्यंत सतत घरट्यातून बाहेर आणि घरट्यातून बाहेर येत जात असे. मी एकदा उत्सुकतेपोटी घरट्यात डोकावून पाहिलं, तर त्यात मला गुलाबी रंगाच्या व त्यावर पांढरे ठिपके असलेली दोन अंडी दिसली. त्यानंतर काही दिवसातच त्यातून दोन सुंदर नाजूक, गोजिरवाणी पिल्लं जन्माला आली. इतक्या दिवस एकच दिसणारा बुलबुल आता दोन दिसू लागले होते. त्यापैकी एक नर बुलबुल होता. दोघेही सारखेच होते. त्यामुळे नर आणि मादी ओळखणे मला कठीण होते. पिल्लं जन्माला आल्यानंतर नर आणि मादी दोघेही पिल्लाच्या संगोपनाची जबाबदारी घेतात.

पहाटे सूर्यकिरणांच्या प्रकाशाबरोबर यांच्या दिवसाची सुरुवात होते. मग त्या आई-बाबाची आपल्या नवजात बालकांच्या पालनपोषणाची लगबग सुरू होते. एकजण अन्नाच्या शोधात गेला असेल तर दुसरा घरट्यात असायचा, आणि दुसरा घरट्यात आला की, पहिला अन्नाच्या शोधात बाहेर पडायचा. असा त्यांचा दिनक्रम चालायचा. नर बुलबुलाने छोटासा कीडा तोंडात पकडून आणला होता. मग मादी अन्न शोधायला बाहेर पडली. तिने चिलारीच्या झाडाचं एक पान तोडून आणलं. आपल्या घरट्यापासून १०-१२ फूट अंतरावर असलेल्या एक लाकडावर येऊन थांबली. ती आल्याचा तिने आपल्या नराला संकेत दिला. मग त्यानं घरटं सोडलं. तिने पिल्लाना खाऊ घातलं व ती पिलावर पंख झाकून बसली. आई आणि बाबा दोघेही घरट्यात नसली की, पाच-पाच मिनिटात ती पिल्लं आपली चोच आकाशाकडे करून तोंड उघडून किलबिलाट करीत असत.

कोणीतरी येईल, आपल्याला खाऊ घालेल अशीच त्यांची आशा असावी. फांदी हालल्याची चाहूल लागताच ते मोठ्याने तोंड उघडत.

नर बुलबुल पिल्लांना चारा देऊन लगेच निघून जायचा. पण मादी मात्र थांबायची. ती पिलांना कुरवाळायची, आंजारायची–गोंजारायची. नर येण्याची वाट पाहायची. या निरीक्षणामुळेच मला नर आणि मादी हे ओळखण्यास मदत होई. अन्न घेऊन आल्यावर ते घरट्याजवळच्या फांदीवर किंवा लाकडावर बसायचे. मग अवतीभोवती पाहायचे. कुणी आपल्याला पाहत तर नाही ना? याची खात्री झाली की, घरट्यावर जायचे.

दुपारी मादी बुलबुलाने पिल्लांनी भरवले व घरट्यात आराम करू लागली. ऊन उतरल्यावर नर बुलबुलाने अन्न आणले व थोड्या अंतरावरून आपल्या मादीला आवाज दिला. त्याबरोबर तिने घरटे सोडले. तिने लाल रसरशीत असे काहीतरी आणले होते. सूक्ष्म निरीक्षणानंतर ती कलिंगडाची फोड असल्याचे कळले. नराने आपल्या पिल्लांच्या अन्नासाठी आपली भटकंती सुरूच ठेवली. काही वेळातच त्याने छोटीशी पाल पकडून आणली होती. ती त्याने पिल्लांना खाऊ घातली व स्वतःही त्यावर थोडासा ताव मारला.

सूर्य आता पश्चिमेकडे झुकला होता. काही वेळात सगळीकडे अंधार पडणार हे लक्षात आल्यावर त्यांनी आपली भटकंती थांबवली. पिल्लांचेही दिवसभराच्या अन्नाने पोट भरले असावे. मादी बुलबुल घरट्यापाशी आली. तिने आपल्या पंखांनी संबंध घरटे झाकून टाकले होते. आभाळाखाली मोकळ्या असलेल्या पिल्लांवर आपल्या पंखांनी पांघरून घातले जानना आता वारा, पाऊस, थंडी कशाचीच भीती नव्हती. ते शांतपणे आपल्या आईच्या पंखरूपी पदराखाली गाढ झोपी गेले असावे.

पुन्हा नव्या दिवसाच्या सूर्यकिरणाबरोबर आई–बाबांच्या कामाला सुरुवात व्हायची ती सूर्य क्षितिजाच्या पलीकडे गेल्यावरच थांबायची. जवळपास २० दिवसानंतर रोजच्या पोषण आहारानंतर त्यांच्या पंखांमध्ये बळ यायला सुरुवात झाली होती. सुरुवातीला घरट्यात इवलीशी दिसणारी चोच आता अर्धवट शरीर दिसत होतं. आपणही मोकळ्या आकाशात स्वच्छंदीपणे फिरण्यास सज्ज झालो आहोत, असे त्यांना वाटू लागले होते.

ते अधूनमधून घरट्या बाहेर येऊन थांबायचे. फांदीवर उभे राहण्याचा प्रयत्न करायचे. त्यांचे पाय लटलटायचे. मग पुन्हा घरट्या जायचे. त्यांची नवं जग पाहण्याची धडपड चालली होती. शेवटी त्यांपैकी एका पिल्लाने १२–१५ फुटांवर उंच झेप घेतली. त्याने पाय खाली एका दगडावर टेकवले. त्याचे पाय भयंकर लटलटत होते, अंग थरथरत होते तोल जाऊन ते पडेल की काय? असेच वाटत होते. कदाचित, त्याने बाहेर पडण्याची जरा घाई तर नसेल ना केली? आणखी काही दिवसानंतर ती पिल्ले उडून गेली.

सागर रघुनाथ सुरवसे

# चिमणी वाचवा

विजय जाधव – सुतार
८६९८७८६८५४

'छंद लावी जिवा पिसे' या उक्तीप्रमाणे व्यवसायातून रोजीरोटी जोपासत इतरांसाठीही जगले पाहिजे, असाच काहीसा संदेश देणारे लोक समाजात कार्यरत असतात. आजच्या युगात चिवचिवाट करणाऱ्या चिमण्या शहरातच काय ग्रामीण भागातही दिसेनाश्या झाल्या आहेत. अशा स्थितीत संवेदनशील मन स्वस्थ बसू शकत नाही. सृष्टीतील प्रत्येक जीवाचे अस्तित्व हे पर्यावरणाच्या दृष्टीने अतिआवश्यक आहे. चिमण्यांच्या घटत्या संख्येचा विचार करून नाशिकमधील खुंटेवाडी गावात राहणाऱ्या विजय जाधव या उद्योजकाने एक कल्पक प्रयोग केला आहे. त्याने 'ना नफा–ना तोटा' या तत्त्वावर पर्यावरणपूरक साधनांचा वापर करून अवघ्या दोनशे रुपयात उपलब्ध होईल असे चिमण्यांचे घरटे तयार केले आहे.

चिमण्या कधीच झाडावर घरटे करत नाहीत; त्या नेहमी एखाद्या मोठ्या छिद्रात, बाल्कनीत, पोटमाळ्यावर एखाद्या कोपऱ्यात, दोन भिंतींमधल्या बोळात स्वत:चं घर करतात. मात्र दिवसेंदिवस वाढलेल्या सिमेंटच्या जंगलात चिमण्यांना घरटी बांधायला जागाच शिल्लक राहिली नाही आणि हेच चिमण्यांची संख्या घटण्यामागचं मुख्य कारण ठरलं आहे. हे हेरून विजय जाधव यांनी कृत्रिम घरटी बनवून ती जागोजागी लावण्यासाठी लोकांना प्रवृत्त करण्याचा निर्णय घेतला.

गेल्या चार वर्षांच्या कालावधीत सुमारे चार हजार लोकांपर्यंत त्यांनी कृत्रिम घरटी पोहोचवली आहेत. आत्तापर्यंत बसवलेल्या घरट्यांपैकी ९९ टक्के घरट्यांमध्ये चिमण्यांनी घर केले आहे. चिमण्या वर्षातून दोन वेळा प्रत्येकी तीन अंडी घालतात. यानुसार ढोबळ गणित मांडल्यास आत्तापर्यंत जवळपास २४ हजार पिल्लांनी या घरट्यांमध्ये जन्म घेतला आहे, असं म्हणता येईल.

विजय जाधव यांच्या खुंटेवाडी स्थित वर्कशॉपमध्ये विविध साइज आणि डिझाईनमध्ये ही घरटी उपलब्ध आहेत, मोठ्या घरट्यांमध्ये २–३ चिमण्यांची कुटुंबे राहण्यासाठी जागा असते. चिमण्यांबरोबरच या घरट्यांमध्ये छोटे पक्षीही अंडी घालत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या पक्ष्यांचेही संरक्षण–संवर्धन होते. या उपक्रमामुळे चिमण्यांची संख्या वाढत असली तरी नष्ट होणाऱ्या चिमण्यांच्या तुलनेत नव्याने जन्माला येणाऱ्या पिल्लांचं प्रमाण फारच कमी आहे.

चिमण्यांच्या संरक्षण आणि संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी 'चिमणी वाचवा' नावाची संस्था स्थापन करण्याचा त्यांचा मानस आहे.

नाशिकमधील एका खेड्यातून हा व्यवसाय होत असला तरी तुम्ही देशाच्या कोणत्याही कोपऱ्यातून ऑनलाइन ऑर्डर नोंदवू शकता.





# पक्षी जगतावरील संक्रांत टाळण्यासाठी...

पक्षीमित्र- हेमराज पाटील
चोपडा, जळगाव

पक्षी निरीक्षण करीत असताना पक्षी संवर्धन हे तितकेच महत्त्वाचे आहे. जैवसाखळीतील हा अति महत्त्वाचा घटक अनेक कारणांनी उपेक्षित व संकटात आहे. त्यातीलच एक महत्त्वाचे कारण म्हणजे पतंग उडवणे व काटणे. मकर संक्रांती या कालावधीत शेकडो पक्षी जखमी होतात, प्राणही गमावतात. माझ्या चोपडा गावात मी पक्षी मित्र व संवर्धक म्हणून कार्यरत आहे, हे आता सर्वांनाच ठाऊक आहे. म्हणून कोणत्या ना कोणत्या कारणांनी जखमी, अस्वस्थ पक्ष्यांना मदतीसाठी मला अनेक फोन येत असतात. यावर्षी डिसेंबर-जानेवारी महिन्यात तर कळसच झाला. माझीदेखील खूप धावपळ व दमछाक झाली. किमान अकरा पक्षी रेस्क्यू करण्यासाठी मला माझे विद्यार्थी, पालक आणि काही नागरिकांकडून फोन आले.

यामध्ये हरियल, जंगली कबूतर, पांढऱ्या छातीचा किंगफिशर, इंडियन सिल्वर बिल, साळुंकी, कावळा इत्यादी पक्षी होते. या पक्ष्यांवर आवश्यक ते उपचार, ड्रेसिंग करून पाच ते सहा दिवसानंतर त्यांच्या मूळ नैसर्गिक अधिवास क्षेत्रात मुक्त करण्यात आले. माझ्याकडे आलेला कावळा चक्क नऊ दिवस पाहुणा म्हणून माझ्याकडे राहिला. ज्याला जागेवरून उडणे तर दूरच पण चालता येणे शक्य नव्हते, त्यावर योग्य सुश्रुषा व औषधोपचार करून ठणठणीत करण्यात मला निसगनि मोलाची साथ दिली. तसेच चोपड्यातील पशुवैद्यकीय अधिकारी सौ.इंगळे मॅडम यांनी अनमोल सहकार्य केले.या कावळ्याला मुक्त केल्यानंतर मी व माझ्या घरातील सर्व सदस्य चार ते पाच दिवस खूप अस्वस्थ होतो,कोणीतरी जवळची व्यक्ती घरात नाही आहे असे सारखे वाटत होते. सर्वांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या, यात माझी पत्नी सौ अश्विनी, मुले आर्यदीप व कृष्णप्रिया तसेच हा पक्षी रेस्क्यू करण्यासाठी विद्यार्थिनी प्रतीक्षा ज्ञानेश्वर पाटील व तिच्या पालकांनी वेळेवर फोन करून कावळ्याला वाचविण्यात योगदान दिले.

मिळून सारेजण, करूया द्विजगण रक्षण,

पक्षी संवर्धन हेच पर्यावरण रक्षण-..

## महाराष्ट्र पक्षिमित्र पुरस्कार २०२०

पक्षी संवर्धन, जनजागृती या क्षेत्रात सातत्याने केलेल्या कामाबद्दल तसेच पक्षी विषयक संशोधन, संवर्धन, जनजागृती, पक्षी उपचार, सेवा व सुश्रुषा या क्षेत्रात कार्यरत व्यक्ती/ संस्थांचा गौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने २०१९ पासून महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पुरस्कार देण्यात येत आहेत. या पुरस्कारांची माहिती पुढीलप्रमाणे –

१) महाराष्ट्र पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार

२) महाराष्ट्र पक्षिमित्र पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार

३) महाराष्ट्र पक्षिमित्र पक्षी संशोधन पुरस्कार

४) महाराष्ट्र पक्षिमित्र पक्षी जनजागृती पुरस्कार

पुरस्कारासाठी प्रस्ताव
स्विकारण्याची अंतिम तारीख
दि. १५ ऑक्टोबर २०२०

पुरस्कारांचे स्वरूप –

**१. जीवन गौरव पुरस्कार –** 'स्व. रमेश लाडखेडकर स्मृती, महाराष्ट्र पक्षिमित्र, जीवन गौरव पुरस्कार– २०२०' असे पुरस्काराचे नाव असेल. दीर्घकाळ पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन, पक्षीविषयक जनजागृती यासाठी कार्य केलेल्या जेष्ठ व्यक्तीच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार देण्यात येईल. यासाठी किमान वयाची ६० वर्षेपूर्ण केलेल्या व्यक्तीस हा पुरस्कार देण्यात येईल. 'महाराष्ट्र पक्षिमित्र'चे सभासद, पक्षिमित्र संमेलनामधील सहभाग, पक्षीमित्र चळवळीतील सहभाग इ.चा प्राधान्यक्रमाने विचार करण्यात येईल. पुरस्कार राशी रु. ५०००/– इतकी रक्कम व प्रमाणपत्र, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. पुरस्कार त्या त्या वर्षी होणाऱ्या संमेलनात प्रदान करण्यात येईल. हा पुरस्कार 'विदर्भ पक्षिमित्र मंच' द्वारा डॉ. अनिल पिंपळापुरे यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

**२. पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार–** 'स्व. डॉ. जी. एन. वानखेडे स्मृती, महाराष्ट्र पक्षिमित्र, पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार – २०२०' असे पुरस्काराचे नाव असेल. हा पुरस्कार पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन, जखमी पक्षी उपचार व सुश्रुषा या क्षेत्रात कार्यरत व्यक्ती किंवा संस्था यांना देण्यात येईल. पुरस्कार राशी रु. २०००/– इतकी रक्कम, प्रमाणपत्र, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. पुरस्कार त्या त्या वर्षी होणाऱ्या संमेलनात प्रदान करण्यात येईल. हा पुरस्कार स्व.डॉ.जी.एन.व्ही. मेमोरियल मेडल फंड तर्फे स्व. डॉ. जी. एन. वानखेडे यांचे विद्यार्थ्यांकडून प्रायोजित करण्यात आलेला आहे.

**३. पक्षी संशोधन पुरस्कार –** 'स्व. डॉ. व्ही. सी. आंबेडकर स्मृती, महाराष्ट्र पक्षिमित्र, पक्षी संशोधन पुरस्कार – २०२०' असे पुरस्काराचे नाव असेल. हा पुरस्कार पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास, संशोधन, आणि त्यातून संवर्धन असे कार्य करणाऱ्या या क्षेत्रातील कार्यरत व्यक्ती किंवा संस्था यांना देण्यात येईल. पीएचडीचे संशोधन, प्रकल्पातील कार्य, संशोधन निबंध, प्रकाशित साहित्य, पेपर, रिपोर्ट, पक्षी नोंदणी अहवाल इ.चा

विचार करण्यात येईल. पुरस्कार राशी रु. २०००/– इतकी रक्कम व व प्रमाणपत्र, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. पुरस्कार त्या त्या वर्षी होणाऱ्या संमेलनात प्रदान करण्यात येईल. यावर्षी हा पुरस्कार वाईल्डलाई' हेरीटेज कन्झर्वेशन सोसायटी, नाशिक तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

४. पक्षी जनजागृती पुरस्कार –'स्व. ईश्वरदयाल गौत' स्मृती, महाराष्ट्र पक्षिमित्र, पक्षी जनजागृती पुरस्कार – २०२०' असे पुरस्काराचे नाव असेल. हा पुरस्कार पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास, आणि त्यातून जनजागृती आणि संवर्धन असे कार्य करणाऱ्या या क्षेत्रातील कार्यरत व्यक्ती किंवा संस्था यांना देण्यात येईल. पुरस्कार राशी रु. २०००/– इतकी रक्कम व प्रमाणपत्र, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. पुरस्कार त्या त्या वर्षी होणाऱ्या संमेलनात प्रदान करण्यात येईल. यावर्षी हा पुरस्कार 'नेस्ट, पालघर, द्वारा श्री. सचिन मेन' यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

### नियम आणि अटी :

जीवन गौरव पुरस्कार हा एका व्यक्तीस आणि इतर तीन पुरस्कार हे व्यक्ती किंवा संस्था यांना देण्यात येतील. यासाठी पुरस्कार राशी अनुक्रमे रु. ५०००/–, रु.२०००/–, रु. २०००/– व रु. २०००/– इतकी रक्कम, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे पुरस्कारचे स्वरूप राहील. दरवर्षी प्रत्येकी एक पुरस्कार देण्यात येईल, गरज पडल्यास विभागून देण्यात येईल (जीवन गौरव सोडून). चारही पुरस्कार त्या त्या वर्षी होणाऱ्या संमेलनात प्रदान करण्यात येतील. पुरस्कारासाठी संस्था निवड करण्यात येत असल्यास म. प. संलग्नित संस्थेस प्राधान्य देण्यात येईल. वरील पुरस्कारांसाठी स्वतः किंवा इतर व्यक्ती किंवा संस्था मार्फत प्रस्ताव सादर करता येतील. एखाद्या गटात योग्य प्रस्ताव प्राप्त न झाल्यास पुरस्कार जाहीर करण्यात येणार नाही. पुरस्कार निवडीसाठी निवड समिती कार्यकारिणी सभेत ठरविण्यात येऊन समिती प्राप्त प्रस्तावांवर सर्वंकष विचार करून पुरस्कार विजेत्यांची नावे 'महाराष्ट्र पक्षिमित्र'कडे सादर करेल. विजेत्यांची नावे 'महाराष्ट्र पक्षिमित्र'तर्फे जाहीर करण्यात येतील. महाराष्ट्र पक्षिमित्र कार्यकारिणीतील सदस्य किंवा त्यांचे कुटुंबीय या पुरस्कारासाठी अर्ज करू शकणार नाहीत, किंवा त्यांना पुरस्कार देण्यात येणार नाही. पुरस्कारासाठी प्रस्ताव महाराष्ट्र पक्षिमित्रच्या पत्त्यावर १५ ऑक्टोबर २०२० पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यादरम्यान पुरस्कारार्थी यांची नावे जाहीर करण्यात येतील. पुरस्कार प्राप्त व्यक्तीस निवड झाल्याचे ई–मेल/पत्र किंवा फोनद्वारे कळविण्यात येऊन आगामी संमेलनाची तारीखसुद्धा कळविण्यात येईल, तसेच तारीख निश्चित झाल्यानंतर रीतसर निमंत्रण पाठविण्यात येईल.

# पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कारासाठी भरावयाचा अर्जाचा नमुना (व्यक्तीकरिता)

अर्जदाराचे नाव – ______________________

स्त्री/पुरुष – ______________________

जन्म तारीख – ______________________

शिक्षण व अनुभव – ______________________

पत्रव्यवहाराचा पत्ता – ______________________

ई–मेल – ______________________

फोन नंबर – ______________________

संलग्नित संस्था – ______________________

'पक्षिमित्र'चे सभासद आहात का? (असल्यास सभासद क्र. व सभासदत्व घेतल्याची तारीख)

'पक्षिमित्र'च्या उपक्रमातील सहभाग – ______________________

(संमेलनात सहभाग / संमेलनात सादरीकरण/ आयोजक म्हणून जबाबदारी/ संमेलनाचे अध्यक्षपद/पक्षीमित्र अंकामध्ये लिखाण /पक्षी सप्ताह आयोजन/ नायलॉन मांजा आंदोलन इ.) पक्षीविषयक कार्य (अभ्यास/ संशोधन/ जनजागृती/ संवर्धन/ प्रकाशित संशोधन) पक्षी गणनामध्ये सहभाग (महापक्षी गणना/ डॉ. सालीम अली पक्षी गणना/ सुगरण पक्षी गणना/पाणपक्षी गणना/ सामान्य पक्षी गणना)

संकटग्रस्त पक्षी अभ्यास/संवर्धन विषयक कार्य – ______________________

पक्षी संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य – ______________________

प्रकाशित साहित्य – ______________________

प्राप्त पुरस्कार – ______________________

प्रस्ताव सादर करणाऱ्यांची माहिती (इतरांकडून सादर केल्यास)– नाव, पत्ता, फोन नंबर

(प्रत्येक मुद्द्याची माहिती स्वतंत्र भरता येईल, आवश्यक तेथे प्रमाणपत्रे, बातम्या, इ.ची झेरॉक्स प्रत जोडावी.)

## महाराष्ट्र पक्षिमित्र संवर्धन व सुश्रुषा, संशोधन आणि जनजागृती या तीनपुरस्कारासाठी भरावयाचा अर्जाचा नमुना(व्यक्ती आणि संस्था करिता)

अर्जदाराचे नाव – ______________________________

स्त्री/पुरुष – ______________________________

जन्म तारीख – ______________________________

शिक्षण व अनुभव – ______________________________

पत्रव्यवहाराचा पत्ता – ______________________________

ई–मेल – ______________________________

फोन नंबर – ______________________________

संस्था नोंदणी बाबत माहिती – ______________________________

'पक्षिमित्र'चे सभासद आहात का? संस्था महाराष्ट्र पक्षिमित्र सोबत संलग्नित आहे का ? (असल्यास सभासद क्र. व सभासदत्व घेतल्याची तारीख) – ______________________________

पक्षिमित्रच्या उपक्रमातील सहभाग (संमेलनात सहभाग / संमेलनात सादरीकरण/ आयोजक म्हणून जबाबदारी/ संमेलनाचे अध्यक्षपद/ पक्षिमित्र अंकामध्ये लिखाण /पक्षी सप्ताह आयोजन/नायलॉन मांजा आंदोलन इ.) – ______________________________

पक्षीविषयक कार्य (अभ्यास/ संशोधन/ जनजागृती/संवर्धन/ प्रकाशित संशोधन) – ______________________________

पक्षी गणनामध्ये सहभाग (महापक्षी गणना/ डॉ. सालीम अली पक्षी गणना/ सुगरण पक्षी गणना/पाणपक्षी गणना/ सामान्य पक्षी गणना) – ______________________________

संकटग्रस्त पक्षी अभ्यास/ संवर्धन विषयक कार्य – ______________________________

पक्षी संवर्धन व उपचार क्षेत्रातील कार्य – ______________________________

प्रकाशित साहित्य – ______________________________

प्राप्त पुरस्कार – ______________________________

प्रस्ताव सादर करणाऱ्यांची माहिती (इतरांकडून सादर केल्यास)नाव, पत्ता, फोन नंबर – ______________________________

(प्रत्येक मुद्याची माहिती स्वतंत्र भरता येईल, आवश्यक तेथे प्रमाणपत्रे, बातम्या, इ.ची झेरॉक्स प्रत जोडावी.)

# टपाल तिकिटांच्या दुनियेत

रवींद्र वामनाचार्य
नाशिक
मो.नं. ९८९०३९०५२७
E-mail : r-wamanacharyayahoo.co.in




Flame-throated Bulbul (Pycnonotus gularis)
माणिक–कंठी बुलबुल

हा जंगलात वास्तव्य करणारा बुलबुल प्रजातीमधील पक्षी आहे. हा पक्षी पश्चिम घाटामध्ये महाराष्ट्र व गोवा, कर्नाटक ते केरळ या प्रांतात १२०० मीटर उंचीवर आढळून येतो. हा जंगलात रहाणारा पक्षी असल्याने जंगलाच्या काठावर तसेच कॉफीच्या मळयामध्ये वास्तव्य करतो. याची लांबी १८ सें.मी इतकी आहे. याच्या पाठीचा रंग ऑलिव्ह हिरवा असतो तर शरीराचा खालील भाग पिवळ्या रंगाचा असतो. गळा त्रिकोणी आकाराचा नारिंगी लाल रंगाचा असतो, डोक्याचा भाग काळया रंगाचा असतो, डोक्यावर किंचित तुरा असतो. चोच गर्द तपकिरी ते काळया रंगाची असते. डोळ्याचे बुबुळ पांढऱ्या रंगाचे असते.

या पक्ष्याचा प्रजनन काळ मुख्यत्वे फेब्रुवारी ते एप्रिल असा आहे. घरटयाचा आकार लहान कपाएवढा असतो, ते पिवळया पानांपासून बनवलेले असते व कोळीष्टकाने विणलेले असते. जमिनीपासून १ ते ३ मीटर उंचीवर आढळते. हे पक्षी अन्नाच्या शोधासाठी छोटया समुहाने जंगलात फिरत असतात, याचे अन्न फळे, कीटक व बिया हे आहे.

माणिक –कंठी बुलबुल हा गोवा राज्याचा राज्य पक्षी आहे त्यामुळेच गोवा येथे ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२० मध्ये भरणाऱ्या ३६ व्या राष्ट्रीय खेळांच्या स्पर्धेचा शुभंकर म्हणून या पक्ष्यास मान मिळाला आहे. दि. १७.०१.२०२० रोजी गोवा येथे आयोजित केलेल्या तिसऱ्या पक्षी महोत्सवानिमित्त भारतीय टपाल खात्यातर्फे विशेष आवरण प्रकाशित केले होते, त्यावर माणिक कंठी बुलबलचे चित्र असून तिकिटाच्या शिक्यावर या पक्ष्याची प्रतिमा अंकित केली आहे.

## पक्षी मरताना कुठे जातात ?

नरेश साधवानी यांच्या मूळ इंग्रजी लेखाचा मी केलेला अनुवाद प्रसन्न सकाळी मी माझ्या आवडीच्या चहा पिण्याच्या जागेवर बसून नेहमीप्रमाणे आजूबाजूच्या घनदाट वटवृक्षांवर चिवचिवाट करणाऱ्या माझ्या सोयऱ्यांना ऐकत होतो. सर्वच जण तिथे कायमचेच रहिवासी होतो. माझी सकाळ आणि त्यांचे वटवृक्षांमधून चिवचिवणे हा दररोजचा उपक्रम. कित्येक वर्षेमी या माझ्या मित्रांना चिवचिवाट करताना, भाडताना, मारामाऱ्या करताना बघितलेय; पण आजपर्यंत कधी एका पक्ष्यालाही झाडाखाली मरून पडलाय किंवा अजून कुठे आमच्या कॉलनीच्या परिसरात मृतावस्थेत पडलाय असे बघितले नाही. किंबहुना जगात कुठेही असा मृत पक्षी मिळालाय असे आढळत नाही. हा एखाद्या मांजरीने मारुन निष्काळजीपणे सोडून दिलेले अवशेष किंवा एखाद्या अपघातात चिरडलेले पक्षी बऱ्याच वेळा दिसले असतील; पण नैसर्गिक मेलेला पक्षी आजपर्यंत तरी कुठेच आढळत नाही. मग पक्षी काय अमर असतात का? की त्यांना नैसर्गिक मरण येतच नाही? या प्रश्नांची उत्तरे मी गुगलवर शोधायचा प्रयत्न केला; पण गुगलने काही तर्कशुद्ध उत्तरे दिली नाहीत. अनेक पक्षिनिरिक्षणांच्या साईट्स, पक्षितज्ज्ञांचे लेख सर्व काही शोधून झाले पण कुठेही काही ठोस उत्तर मिळाले नाही.

आणि मग या प्रयत्नातच मला एक रंजक लेख वाचायला मिळाला Dying pattern of Birds ह्या लेखात कॉर्क बिशप ल्युसी यांनी एक थोडी वादग्रस्त ठक्षप शकणारी थेअरी मांडलीय, लेखाची सुरुवातच पक्षी मरण्यासाठी कुठे जातात अशी करून बिशप ल्युसीने सर्वांनाच असे आव्हान दिलेय की, कुणीही जगात नैसर्गिक मृत झालेल्या पक्षी पुरावा म्हणून दाखवावा. आजपर्यंत तरी त्याचे हे आव्हान कुणीही स्वीकारलेले नाही. लेखकाने मरण्याच्या कारणांची स्पष्ट वर्गवारी दिलीय, एकीकडे नैसर्गिक कारण दुसरीकडे शिकार, अपघात, मुद्दाम पक्षिहत्या अशी वेगळी कारणे. परंतु मजेची गोष्ट अशी की, आजपर्यंत तरी नैसर्गिक कारणाने मृत असा एकही पक्षी कुणी पुरावा म्हणून सादर करू शकले नाहीय, पक्षी शास्त्रज्ञसुद्धा या बाबतीत ठोस सांगू शकत नाही. दरवर्षी पक्ष्यांची गणना करून ते सरासरी पक्ष्यांचा मृत्यूदर ठरवतात. या बिशप ल्युसींचा मधमाश्यांच्या जीवनक्रमावरचे संशोधन जगमान्य आहे, ते सांगतात मधमाशा मृत्यू समिप आला की, खूप उंच वरच्या उच्च दबावाच्या हवेत स्वतःला घेऊन जातात आणि तिथे दबावामुळे त्यांचे अक्षरशः नैसर्गिक विघटन होते आणि त्या नष्ट होऊन जातात. यावरून बिशप म्हणतात की, पक्ष्यांनासुध्दा मधमाशाप्रमाणे अंतःप्रेरणेच एक इंद्रिय असावे जे त्यांना जाणीव करून देते की, आता शेवटचा क्षण आला आहे किंवा जीवनकाल संपत आलाय आणि ही जाणीव होताच पक्षी आकाशात स्वःतला उंच उंच घेऊन जातात जोपर्यंत त्यांचे विघटन होत नाही तोपर्यंत ते वरती वरतीच चढत जातात. बिशपची ही थेअरी मला तरी स्वीकारार्ह वाटते. कारण दुसरे कुठलेच लॉजिकल स्पष्टीकरण सध्या तरी नाही. अजूनपर्यंत तरी या थेअरीला शास्त्रज्ञांकडून कुठलेही खंडन झालेले नाही. यावरून आपण एक गोष्ट निश्चितच म्हणू शकतो की, पक्षी मानवापेक्षा उत्क्रांतीच्या पुढच्या पायरीवर आहेत की, त्यांना ही जाणीव होऊ शकते की, आपला अंत्यसमय आलाय. जे माणसाला अजूनही अज्ञात आहे. पक्षी निश्चित ठरवू शकतो की, त्याने खूप जगून झालेय, बघून झालेय आणि तो आनंदाने कसलीही खंत-चिंता न बाळगता उंच उडून शरीराचे विघटन करून टाकतो. वयानुसार येणाऱ्या व्याधी, न सोसायचे दुःख आपल्यपेक्षा ते पुढेच आहेत. कुठेही जाण्याचे, विहाराचे स्वातंत्र्य, कुठलीही सीमा नाही, पासपोर्ट नाही, पिल्ले मोठी झाली की, त्यांच्यापासून सहजगत्या स्वतःला सोडवून परत कधीही न भेटणे सहज स्वीकारणारी. आणि स्वतःच्या मृत्युची वेळही स्वतःच निश्चि करणारी... मोक्ष अजून काय वेगळा असतो?

(इंटरनेटवर हा लेख मिळाला आहे, त्याचे लेखक कोण आहेत माहीत नाही)

''पक्षी मरतांना जातात कुठे?'' अशा आशयाचा एक मेसेज मागील वर्षीपासून समाजमाध्यमांवर फिरत आहे. या मेसेज मधील केलेला दावा तथ्यहीन आणि अशास्त्रीय स्वरूपाचा आहे. मात्र त्यातील मजकुरामुळे सर्वसामान्यांमध्ये उगीच गैरसमज निर्माण होत आहेत. यावर खुलासा व्हावा म्हणून हा मेसेज येथे जसाचा तथा प्रकाशित करण्यात येत असुन त्याखाली त्यावरील खुलासा देण्यात येत आहे.

- मागील वर्षीपासुन अनेक ग्रुपवर पक्षी मरताना कुठे जातात याबद्दल एक पोष्ट फिरत आहे, आणि लोक फारसा विचार न करता ती पुढे पाठवत आहेत. या अशास्त्रीय माहिती मुळे चुकीची माहिती आणि संदेश जात आहे.
- ही पोष्ट लिहीनारे निसर्ग लेखक आहेत. परंतु शास्त्रज्ञ किंवा पक्षीनिरीक्षकही नाहीत. असे निष्कर्ष मांडण्यापुर्वी त्यांनी कुठलेही प्रयोग किंवा सर्व्हेक्षण केलेले नाही. किंवा त्यांनी ज्यांचा दाखला दिला ते सुद्धा पक्षी अभ्यासक नाहीत.
- पक्षांप्रमाणे  सरडे, पाली, उंदीर, साप हे सुद्धा कधी वयमानाने मेलेले निसर्गात आढळून येत नाहीत. (कधी कधी दिसतात सुद्धा, मात्र आपन त्याची दखल न घेतल्याने लक्षात राहत नाही) मग त्यांना कसा मोक्ष कसा मिळत असेल? असा विचार ही पोष्ट वाचतांना आपल्याला येतो का? यायला तर हवाच. असो. जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाला मरण अटळ आहे, आणि तोच निसर्गाचा नियम आहे. निसर्गाचं एक चक्र आहे, अन्नसाखळी आहे. एक जीव दुसऱ्याला खाऊन जगत असतो.
- निसर्गाची विघटन करण्यासाठीची पण प्रणाली विकसित झालेली आहे. बरेचदा हे लहान प्राणी, पक्षी आपल्या शिकाऱ्याच्या (Predator) भक्ष्यस्थानी पडतात. म्हातारे, कमजोर, किंवा जखमी वगैरे झाल्यावर तर नक्कीच पडतात. आणि समजा कुणी त्याला मारलं नाही, तर तो ज्या क्षणाला मरुन पडेल, त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत त्याला खानारे, प्राणी, किटक, मुंग्या, कींवा काही काळानंतर किडे (Maggots) निर्माण होऊन ते पार्थिव संपवून टाकले जाते. विघटनाची (Decompose) ही प्रक्रिया निसर्गात फार वेगाने घडते. पक्षांमधील गिधाडांचे सुद्धा असेच कार्य आहे.
- त्यामुळे पक्षी उंच उंच जाऊन मोक्ष पावतात हा समज अशास्त्रीय आहे. तो कुठल्या तरी धार्मिक कथेतून निर्माण झाला असावा.
- सरते शेवटी – मी जंगलात फिरताना मेलेले पक्षी बघीतले आहेत. पक्ष्यांची पिल्ल मरतांना तर आपन अनेकांनी बघीतली असतील. मी माझ्या घरी दोनदा नवरंग पक्षी आणि एकदा दयाळ मरुन पडलेला बघीतला आहे.
  (मी सुद्धा हे लिहीण्यापुर्वी काही शास्त्रीय प्रयोग केले नाहीत, मात्र हे मत निसर्गातील आजवरच्या निरीक्षणावरून मांडले आहे, पटते का बघा!)

धन्यवाद !



– डॉ. जयंत वडतकर
अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षिमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
९८२२८७५७७३

## स्वागत नवीन सभासदांचे
## (दि. १ एप्रिल २०२० ते ३० जुन २०२०)

| क्र. | नाव | गाव | फोन नं. |
|---|---|---|---|
| ११८० | चिन्मय प्रकाश सावंत | देवनार, मुंबई | ९७०२००१४३७ |
| ११८१ | श्री. संतोष आ. जाधव | लोणार | ९८९०४६४९१५ |
| ११८२ | श्री. सचिन रा. कापुरे | लोणार | ८८८८१८८५०८ |
| ११८३ | श्री. विलास आ. जाधव | लोणार | ७५८८५२०५२५ |
| ११८४ | श्री. अरुण गु. मापारी | लोणार | ८८८८०२२०९९ |
| ११८५ | प्रभात सुनील म्हस्के | राहुरी | ७३७८५१२५६१ |
| ११८६ | ॲड. राजमेहर निशाने | दर्यापूर | ७३८५५२६६५३ |
| ११८७ | श्री. प्रकाश रा. पाटील | अ.नगर | ९४२१५८९०५० |
| ११८८ | स्वप्नील डी. वानखडे | भंडारा | ९०९६८५६३४९ |
| ११८९ | डॉ. प्रदीप एम. व्यवहारे | धुळे | ९४२२७०६९३७ |
| ११९० | विनयकुमार डी. बनकर | इचलकरंजी | ९४२३२८४८१३ |
| ११९१ | डॉ. राधिका अनंथक्रिशनन | वाशी | ९८२०६८२०८५ |
| ११९२ | शामकांत पोतनीस | माहीम | ९६१९१०७४५५ |
| ११९३ | शिवाजी बंडू बळी | वाशीम | ७५८८८८४७२३ |
| ११९४ | संतोष द. शेटे | वाशीम | ९४२१८३४३८३ |
| ११९५ | डॉ. सोनाली देवगिरीकर | मुंबई | ९९२०३२६४७६ |
| ११९६ | अक्षदा र. देसाई | मुंबई | ९८२१७५७६०० |
| ११९६ | प्रमोद आ. कुंभार | कोल्हापूर | ९९७५७०४५२२ |
| ११९८ | आशिष अ. बाबरे | पालघर | ७७९८८२७१९९ |
| ११९९ | अनिल बबन थेटे | नाशिक | ७८८७८५१११० |
| १२०० | ललिता आष्टेकर पोयारेकर | ठाणे | ९८६७५९२१०८ |
| १२०१ | अक्षय भाऊ आखाडे | सोलापूर | ९३७०९५७४४६ |
| १२०२ | डॉ. अभय डी. शेळके | चाळीसगाव | ९७६५२१३०४३ |
| १२०३ | विवेक विश्वास जोशी | कल्याण | ९८३३१७४९२३ |
| १२०४ | डॉ. कृष्णा राजू नगरे | सिल्लोड | ९५७९४२१७२३ |
| १२०५ | डॉ. गायत्री दिलीप हांडे | अमरावती | ९४२०७१२७७५ |

**भारतीय पक्षी संकटात :** 'दि स्टेट ऑफ इंडियन बर्ड २०२०' हा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. तो ८६७ पक्षी जातींच्या १५००० हून अधिक निरीक्षणातून सिद्ध झाला आहे. त्यातून गेल्या २५ वर्षांत भारतातील निम्म्याहून अधिक पक्षी जाती घटल्या आहेत. त्यातही पांढरपाठी गिधाडे, रिचर्डचा पिपिट, भारतीय गिधाड, मोठ्या चोचीचा लीफ बॉर्बलर, पॉलिफिक गोल्डन प्लोवर अणि कल्यू सँडपायपर यांनी पिछेहाटीत आघाडी घेतलेली आहे. शिकारी पक्षी आणि सँडपायपरची घट सर्वात जास्त म्हणजे ७९ टक्के गेल्या पाच वर्षांत झालेली आहे. या अहवालानुसार मोरड्या, कबूतर, ग्लॉसी आयविल प्रीनिया आणि मोरांची संख्या वाढलेली आहे.

**आणखी एक दुर्घटना :** जागतिक पातळीवर गिधाडांची संख्या कमी होत आहे. त्यात आणखी भर टाकली आहे, ब्रुनेई–निस्साऊ या देशाने. तेथील सुमारे २००० गिधाडांचा विषबाधेने मृत्यू झाला.

**सांभर तळे : पक्ष्याच्या मृत्यूचे सापळा :** राजस्थानातील सांभर तळे हे पक्ष्यांचे आवडते वसतीस्थान आहे. त्याच्या परिसरात अनेक बोअरवेल्स आहेत. या विहिरींना जोडणाऱ्या बहुतेक तारा उघड्या आहेत. उघड्या तारांमुळे पाण्यात विद्युत प्रवाह उतरल्याने शेकडो पक्षी भाजून मेले. त्यांच्या मृत शरीरावर पोसणाऱ्या जंतूंमुळे आणखी पक्षी मेले. तेथे २००० पक्षी दगावल्याचे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने प्रसिद्ध केले आहे.

**मृत्यूची खाई :** राजस्थानमधील सांभर जलाशय साधारण १५६ किलोमीटर विस्ताराचा आहे. तिथे दरवर्षी सायबेरिया आणि गुजरातमधून २ ते ३ लाख प्रवासी पक्षी येतात. सरकारने जाहीर केल्याप्रमाणे आतापर्यंत १७००० हून अधिक पक्षी मृत झाले आहेत. त्यात २५ जातींचे पक्षी आहेत. जयपूरच्या रोगचिकित्सा केंद्राने भोपाळच्या केंद्राकडे पक्ष्यांचे नमूने कारण शोधण्यकारिता पाठविले होते. अंदाज असा आहे की, मृत पक्ष्यांनी काही विषारी पदार्थ खाल्ला असावा. बरेलीहून येणाऱ्या अहवालावरून कारण कळू शकेल.
'डाऊन टू अर्थ'वरून

**लेखकांना सूचना :** 'पक्षीमित्र'साठी अनेक लेखक नव्याने लिहू लागले आहेत, ही बाब स्वागतार्ह आहे; पण त्यांच्या लेखनावर छपाईपूर्व संस्कार करावे लागतात. लेखाचे टंकलेखन करताना दोन ओळीत अंतर ठेवले जात नाही. त्यामुळे दुरुस्त्या करणे अवघड नव्हे अशक्यप्राय होते. तेव्हा विनंती आहे की, टंकलेखन करताना दोन ओळीत अंतर ठेवावे. डावी–उजवीकडे मोकळी जागा ठेवावी. अशी खबरदारी घेतलेली नसेल तर लेखातील मजकूर आकर्षक असेल तरीही तो स्वीकारला जाणार नाही, असे खेदाने नमूद करावे लागत आहे.

–संपादक

**श्रद्धांजली**



स्व. प्रकाश कामडे
(चंद्रपुर)

चंद्रपूर येथील सार्ड (S-RD) ह्या वन्यजीव संस्थेचे अध्यक्ष व महाराष्ट्र पक्षिमित्र चे आजिवन सदस्य प्रकाश कामडे ह्यांचे दीर्घ आजाराने दि. १३ जुलै रोजी निधन झाले. नोकरी सोडून ते निसर्ग संरक्षण चळवळीत आले होते. त्यांच्या संस्थेतर्फे वाघ, वन्यजीव संरक्षन व पक्षी ई. साठी त्यांनी आजवर अनेक कार्यक्रम घेतलेत. वनविभागाला ट्रेनिंग ई. साठी साहाय्य करणे, ग्रामीण भागात जाऊन वन्यजीव मानव संघर्ष इ. अनेक कार्यात ते व्यस्त असायचे. चंद्रपुर येथे आयोजित पक्षीमित्र संमेलनात त्यांनी पक्षावरील अभ्यासाची उत्कृष्टपने मांडनी केली होती व पक्षिमित्र संमेलनाच्या आयोजनासाठी सुद्धा उत्सुक होते. त्यांच्या जाण्यामुळे वन व वन्यजीव चळवळीची मोठी हानी झाली आहे.

महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## महाराष्ट्र पक्षिमित्रचे आजच सभासद व्हा !

आजीवन सभासद शुल्क रू. १०००/-

(५०० सभासद शुल्क + ५००/- अंक निधी)

आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

## सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी/मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षिमित्र'' या नावे अमरावती येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.

बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, गाडगे नगर, अमरावती

खात्याचे नाव : महाराष्ट्र पक्षिमित्र

बँक खाते क्र. : 60036812017

IFSC Code : MAHB0000639

खात्यात पैसे भरून त्वरीत मेलने कळविणे, तसेच सभासदत्वाचा अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अनिवार्य आहे. सोबत पे-इन स्लीपची झेरॉक्स जोडावी.

३) पत्रव्यवहाराचा पत्ता :- महाराष्ट्र पक्षीमित्र, द्वारा डॉ. गजानन वाघ, अरण्यार्पण, ६३ समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४

Email : pakshimitra@gmail.com

Phone No. : 0721 - 2552334

Website : www.pakshimitra.org

## त्रैमासिक अंक निधी :

महाराष्ट्र पक्षिमित्र संस्थेचे मुखपत्र त्रैमासिक अंक पक्षीमित्र हा आपण दर तीन महिन्यांनी प्रकाशित करत असतो. या अंकाला छपाई व पोस्टेज मिळून वार्षिक ५५,०००/- ते ६०,००० रूपये खर्च येतो. संस्थेचे नियमित उत्पन्न काहीच नाही त्यामुळे हा अंक परवडत नाही, पक्षीमित्र संस्थेच्या व पक्षी संवर्धन संरक्षण कार्यात या अंकाची अत्यंत आवश्यकता आहे. याचसाठी हा अंक असाच चालू ठेवा असे वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरवण्यात आले आहे. याच्या खर्चासाठी त्रैमासिक अंक निधी उभा करण्याचे ठरविण्यात आले आहे. आपण सुद्धा या अंकासाठी देणगी देऊन हातभार लावावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या प्रकल्पाला आपण सुद्धा देणगी देऊन हातभार लावावा ही विनंती.

# महाराष्ट्र पक्षिमित्र

(संस्था रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर)

## ✻ सभासद अर्ज ✻

प्रति,

मा. अध्यक्ष,

महाराष्ट्र पक्षिमित्र.

महोदय,

मला महाराष्ट्र पक्षिमित्र, नागपूर नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/२८५/९८/नागपूर या संस्थेचे नियम व उद्दिष्ट्ये मान्य आहेत. मी शपथपूर्वक सांगतो की, मी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करीन. मी वरील संस्थेचा आजीवन सभासद होऊ इच्छितो. माझा व्यक्तिगत तपशील खालील प्रमाणे आहे.

संपूर्ण नाव : ____________________

संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

फोन नं. : ____________ मो. नं. : ____________

ई–मेल : ____________________

जन्मतारीख : ____________________

शिक्षण : ____________________

नोकरी/व्यवसाय : ____________________

छंद : ____________________

माझी वर्गणी सोबत देत आहे (D.D. / Money Order / Core Bank System )

कृपया माझी सभासद म्हणून स्वीकृती व्हावी ही नम्र विनंती.

| | | |
|---|---|---|
| दिनांक | अध्यक्ष | आपला |
| अर्ज मंजूर/नामंजूर | महाराष्ट्र पक्षिमित्र | सही |

Visit below link for become a Member

https://www.pakshimitra.org/contact-us/become-a-member